

अंगणवाडी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पंढरीत आरंभ;.... PII

PII

# पंढरी संचार

• पंढरपूर • गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८
pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - २५७

NO PAIDNEWS



माघ यात्रा :वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर प्रशासन सज्ज.... PIII

## At a Glance

### टेंभुर्णी येथे केळी संशोधन केंद्र उभारा



**करमाळा :** सोलापूर जिल्ह्यातील अत्यल्प पर्जन्यमान असलेल्या भागातील शेतकऱ्यांनी कमी पाण्यावर होणाऱ्या केळी या फळाच्या उत्पादनात कृषिक्रांती घडवून आणलेली आहे. येथील शेतकऱ्यांनी देखील केळीमध्ये नव-नवीन वाण तयार करून नांवलौकिक मिळविलेला आहे. केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी संशोधन केंद्र उभारल्यास लगतच असलेल्या तालुक्यातील केळी उत्पादकांना त्याचा नक्कीच चांगला फायदा होईल. यासंदर्भात कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांची आमदार अभिजीत पाटील यांनी भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

### बांधकाम कामगारांची होतेय नोंदणीसाठी लूट



**करमाळा :** बांधकाम कल्याणकारी मंडळाच्याअंतर्गत असलेल्या नोंदणीकृत मजुरांना विविध योजनांचा लाभ मिळतो. यासाठी शैक्षणिक व सामाजिक लाभ, कुटुंबातील लग्न, गरोदर महिला, नैसर्गिक मृत्यू, अपघाती मृत्यू, मजुरांना अवजारे, साहित्य खरेदी तसेच विविध योजनांसाठी ही नोंदणी बंधनकारक असते. यासाठी अर्ज मोफत आहेत. परंतु सध्या माळशिरस तालुक्यात मात्र वेगळेच चित्र दिसत आहे. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून बांधकाम कामगाराच्या नोंदणीच्या माध्यमातून माळशिरस तालुक्यातील कामगारांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत आहे.

### सोयाबीन खरेदीसाठी 2 दिवस बाकी, बाजार समित्यांमध्ये गर्दी

**सोलापूर :** राज्यात सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ दिली असली तरी केवळ दोन दिवस शिल्लक असल्याने शेतकऱ्यांची मोठी गर्दी उसळली आहे. लातूरसह विविध बाजारसमित्यांमध्ये शेतकरी हमीभावासाठी रांगेत उभे आहेत. खरेदी केंद्रांबाहेर रात्रीचा मुक्काम ठोकणाऱ्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. 31 जानेवारीची शेवटची मुदत 6 फेब्रुवारी केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी सोयाबीन खरेदीसाठी केवळ दोन दिवस उरल्याने सोयाबीन घरातच राहण्याची शेतकऱ्यांना टांगती तलवार आहे.

### वयोवृद्धाची होणारी हेळसांड थांबवण्याचे आदेश



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघाचे पश्चिम भारत अध्यक्ष अमोल माने व पदाधिकारी यांच्या वतीने श्रावण बाळ योजनेच्या वयोवृद्धाची होणारी हेळसांड थांबवण्यासाठी, उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज विजया पांगारकर यांना निवेदन देण्यात आले होते, श्रावणबाळ योजनेच्या वयोवृद्धाना निवासी नायब तहसिलदार यांना समक्ष भेटणे बंधनकारक केल्याने श्रावणबाळ योजनेचे वयोवृद्ध महिला व जेष्ठ नागरिकांची हेळसांड होत होती ही हेळसांड थांबविण्याचे आदेश, उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज विजया पांगारकर यांनी दिले आहेत.

# दिल्लीचे तख्त भाजपकडेच!

## एक्झिट पोल्सचे अंदाज : २५ वर्षांनंतर होणार सत्तांत्तर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेसाठी मतदान पार पडले असून आता एक्झिट पोल्सचे अंदाज समोर आले आहेत. बहुतेक एक्झिट पोल्सनी सुमारे २५ वर्षांनंतर राजधानी दिल्लीत भाजपाचे सरकार येणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यामुळे आम आदमी पक्षाला हा मोठा धक्का मानला जातो.

काल सायंत्रकाळी ६ वाजेपर्यंत सुमारे ६५ टक्के मतदान झाले आहे. देशाची राजधानी नवी दिल्लीमध्ये विधानसभेची मतदानप्रक्रिया पार पडली असून आता एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. त्यामध्ये भाजप आणि आप या दोन पक्षांमध्ये जोरदार टक्कर असणार आहे असे चित्र दिसले आहे. बहुतांश एक्झिट पोलमध्ये भाजपची आपवर काहीशी सरशी असल्याचे दिसून आले. दिल्ली विधानसभेच्या एकूण ७० जागांसाठी मतदान पार पडलं. या निवडणुकीत एकूण 699 उमेदवारांनी आपले नशीब आजमावले होते. या सर्व उमेदवारांचं नशीब काल ईव्हीएममध्ये कैद झाले आहे. शनिवारी ८ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभेचा निकाल समोर येणार आहे. या दरम्यान, विविध संस्थांनी केलेल्या सर्व्हेमधून एक्झिट पोलचे अंदाज समोर आले आहेत. एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, दिल्लीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार, दिल्लीत भाजपला 35 ते 40 जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे. तर आपला 32 ते 37 जागांवर विजय मिळण्याची शतक्यता आहे. तर काँग्रेसचा अक्षरशः धुव्वा उडण्याची शक्यता आहे. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार, काँग्रेसला दिल्ली विधानसभा निवडणुकीत शून्य ते केवळ 1 जागा मिळण्याची शक्यता आहे.

चाणक्य

» पान ३ वर




## शिरीष महाराज मोरे यांची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**देहू :** देहूत संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह.भ.प शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्याचा अंदाज आहे. या घटनेमुळे देहू गावावर शोककळा पसरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरीष महाराज यांनी आज सकाळी साडेआठच्या सुमारास राहत्या घरी उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून ही आत्महत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. २० फेब्रुवारीला त्यांचा विवाह होणार होता. शिरीष महाराज मोरे यांनी नवीन घर बांधले होते. खालच्या मजल्यावर आई-वडील आणि वरच्या मजल्यावर ते राहत होते. मंगळवारी रात्री मोरे वरील खोलीत आराम करण्यासाठी गेले होते. सकाळी साडे आठ वाजल्यानंतरही ते खाली आले नव्हते. त्यामुळे घरातील सदस्य वरती गेले. दरवाजा वाजविला पण दार उघडले जात नव्हते. आतून प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे दार तोडण्यात आले. मोरे यांनी पंख्याच्या हुकाला उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. दरम्यान, प्राथमिक दृष्ट्या आर्थिक विवंचेनेतून आत्महत्येचे केल्याचे कळत असल्याचे देहूरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी सांगितले. अधिक तपास देहूरोड पोलीस करीत आहेत. दरम्यान, हभप शिरीष मोरे महाराज यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता वैकुंठ स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

» पान ३ वर

## मूर्तींच्या प्रतिष्ठापणेने पंचकल्याणक कार्यक्रमाची सांगता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर पासून जवळच असलेल्या आढीव येथे जैन समाजा वतीने भव्य तपोवन मंदिर उभा करण्यात आले आहे. गेल्या पाच दिवसापासून येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली असून मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे. गेली पाच दिवस सुरू असलेल्या कार्यक्रमाची आज सांगता करण्यात आली. पंढरपुरातील डॉक्टर शितल शहा यांनी आढीव येथे जैन समाजाचे मंदिर उभा करण्यासाठी पुढाकार घेऊन यासाठी एक कोटी होऊन अधिक रुपये खर्च केले आहेत. या मंदिरात मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व मंदिर दर्शनासाठी खुले करण्यासाठी गेल्या पाच दिवसापासून विविध पंचकल्याणक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जैन समाजातील संत महंत कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच राज्यभरातून अनेक जैन समाजातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. आज बुधवारी मंदिरातील श्री 1008 आदिनाथ भगवान, मूल नायक श्री 1008 मुनिसुव्रतनाथ भगवान, श्री 1008 शांतिनाथ भगवान या तीन प्राणप्रतिष्ठापना विधिवत संत महंतांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. या कार्यक्रमास हजारो नागरिक उपस्थित होते .गेली पाच दिवस कार्यक्रम झाल्यानंतर आज जैन समाजातील सर्व संत महंत यांनी दुसऱ्या गावाकडे प्रस्थान केले.





### आलेगांव खुर्द व भांडगाव बंधारा लवकर होणार

**माढा :** मुंबईत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची भेट घेऊन आमदार अभिजित पाटील विविध मागण्यांबाबत निवेदन दिले. आलेगांव खुर्द व भांडगाव, ता. माढा येथे बंधारा कम पुल (कोल्हापूर पध्दत) उभारण्यासाठी लघु पाटबंधारे अंतर्गत मंजुरी मिळून निधी उपलब्ध करण्याची मागणी केली असता, मंत्री महोदयांनी संबधित अधिकाऱ्यांना कामे मार्गी लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## भाविकांच्या सुविधेसाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना - प्रांताधिकारी सचिन इथापे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** माघ यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे.

यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी चार आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, हे कक्ष 24 तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

माघ वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी 65 एकर, चंद्रभागा वाळवंट, नगरपालिका, पत्राशेड, , विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. भाविकांना काही अडचणी आल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## यात्रेसाठी बंधाऱ्यातून चंद्रभागा नदीत पाणी सोडण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघी यात्रेसाठी पंढरपुरात विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी तीन लाखाहून अधिक भाविक येणार आहेत. भाविकांना चंद्रभागा नदीत पवित्र स्नान करता यावे यासाठी बंधाऱ्यातून चंद्रभागा नदीमध्ये पाणी सोडण्यात यावे अशी मागणी भाविकातून होत आहे. माघी यात्रेची तयारी प्रशासनाने केली आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने भाविकांना सुलभ दर्शन मिळावे म्हणून नियोजन केले आहे. गोपाळपूर रोडवरील रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ आठ दर्शन मंडप उभा करण्यात आले आहेत. येथे भाविकांना नाष्टा, भोजन देण्यात येणार आहे. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यात्रेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याने करडी नजर ठेवण्यात येणार आहे. 65 एकर येथे दिंडी सोहळे निवासाची सोय करण्यात आली आहे. या ठिकाणी 24 तास पिण्याचे पाणी, आरोग्य, वीज याची सोय करण्यात आली आहे. पंढरपुरात आलेले भाविक चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान करतात. मात्र सध्या नदीमध्ये खूप कमी पाणी असल्याने भाविकांना स्नान करण्यास अडचण निर्माण होणार आहे. म्हणून प्रशासनाने बंधाऱ्यातील पाणी चंद्रभागा नदीमध्ये सोडावे अशी मागणी होत आहे. गेल्या वर्षी चांगला पाऊस झाला असल्याने उजनी धरण 100 टक्के पेक्षा अधिक भरले होते. सध्या उजनी धरणात मुबलक पाणीसाठा आहे. यामुळे धरणातून पंढरपूरला पिण्यासाठी पाणी सोडण्यास कोणतीही अडचण जलसंपदा विभागाला येणार नाही. यामुळे प्रशासनाने बंधाऱ्यात असलेले पाणी चंद्रभागा नदीमध्ये सोडावे अशी मागणी होत आहे.

### कार उलटून झालेल्या अपघातात तरुणाचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** भरधाव वेगातील कारचा ताबा सुटून कार उसाच्या शेतात उलटल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू तर तिघेजण जखमी झाल्याची घटना 28 जानेवारी रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुक्यातील माळकवठापासून पाच किलोमीटर अंतरावर घडली. याप्रकरणी फैसल शकील सरकाझी ( वय 21 राहणार औज, तालुका दक्षिण सोलापूर ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार फैसल शकील सरकाझी ( वय 23 राहणार औज) याच्या विरोधात मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा अधिक तपास गुरव हे करीत आहेत.

## ४२ मोटरसायकली मूळ मालकांना परत; तालुका पोलिसांचा उपक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर पोलीस ठाण्यात विविध कारणांनी जप्त करण्यात आलेल्या मोटरसायकली गेल्यावर्षभरापासून पडून होत्या त्या मोटरसायकली मालकांचा शोध घेऊन त्यांना त्या परत करण्यात आल्या पोलिसांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात विविध कारणाने अनेक दुचाकी जप्त करून लावण्यात आल्या होत्या गेल्या वर्षभरापासून या मोटारसायकलीचे मालक त्या घेऊन जाण्यासाठी फिरकले नाहीत यामुळे पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन त्यांना पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात येऊन मोटरसायकली घेऊन जाण्याच्या सूचना केल्या त्यानुसार 42 मोटरसायकली मूळ मालकांना परत करण्यात आल्या पोलिसांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर यांनी मोटरसायकली मूळ मालकांना परत केल्या हे मूळ मालक पुणे जिल्हा व सोलापूर जिल्ह्यातील होते मोटरसायकली परत मिळाल्यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले



## १ हजार ४८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी,६ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज-डॉ.अर्जुन भोसले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** माघ शुद्ध जया एकादशी सोहळा आठ फेब्रुवारी रोजी असून, माघ यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

माघवारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ४८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०२ पोलीस उपअधिक्षक, ७१ पोलीस निरिक्षक, सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ८०० पोलीस कर्मचारी व ६०० होमगार्ड तसेच दोन बीडीएस पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, 65 एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १३ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापना करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच शहरात व मंदिर, मंदिर परिसर , दर्शन रांग आधी ठिकाणी २६० सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी ६ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे .

तसेच वाहतुक नियमनासाठी १३ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १५ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भोसले यांनी केले आहे.

### अश्लील वर्तन प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** अश्लील वर्तन करून तरुणीसह तिच्या वडिलांना वीट फेकून मारून जखमी केल्याने तिघांविरुद्ध मंगळवारी जेलरोड पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा नोंद झाला आहे. याप्रकरणी पिडीतिने दिलेल्या फिर्यादीनुसार उदय कामूर्ती, कृष्णा कामूर्ती, अरविंद कामूर्ती (सर्व रा. साईबाबा चौक) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पीडिता जेवल्यानंतर घरासमोरून फिरत असताना अरविंद याने तिच्याकडे पाहून इशारा करीत लज्जास्पद वर्तन केले. यावर विचारणा केल्यावर त्यांना मारहाण केली. हा प्रकार सोमवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास पूर्व भागात घडला.

## सरकार महाराष्ट्रात ८ लाख घरे बांधणार-उपमुख्यमंत्री शिंदे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आता सर्व सामान्यांच्या घरांचे स्वप्न आता साकार होणार आहे. सरकार महाराष्ट्रातील लोकांचे स्वतःचे घर असण्याचे स्वप्न पूर्ण करणार आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) पुढील पाच वर्षांत राज्यात आठ लाख घरे बांधेल. ही घरे बांधताना त्यांच्या गुणवत्तेची काळजी घेतली पाहिजे, असे एकनाथ शिंदेंनी सांगितले.

कोकण विभागातील २,१४७ घरे आणि ११७ भूखंडांच्या सोडतीनिमित्त गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री शिंदे यांनी ही घोषणा केली. शिंदे म्हणाले की, म्हाडाच्या पारदर्शक लॉटरी प्रणालीमुळे लोकांचा त्यावर विश्वास वाढत आहे.

सध्याच्या लॉटरीत २,१४७ घरांसाठी ३१,००० हून अधिक लोकांनी अर्ज केले आहेत. सरकार लोकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी वचनबद्ध आहे.

यासोबतच, उपमुख्यमंत्र्यांनी क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्पांचे महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यमान शहरी भागात नियोजित शहरे निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून त्यांचे वर्णन केले. ते म्हणाले की, ९ फेब्रुवारी रोजी ठाण्यात अनेक क्लस्टर प्रकल्पांचे भूमिपूजन आणि पायाभरणी केली जाईल. गेल्या काही वर्षांत म्हाडाच्या घरांच्या बांधकामाचा दर्जा खूप सुधारला आहे. राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणात कापड गिरणी कामगार आणि मुंबईतील प्रसिद्ध 'डबेवाले' यांच्यासाठी तरतुदींचा समावेश असेल, जेणेकरून त्यांना परवडणारी घरे मिळतील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

**सोलापूर :** जिल्ह्यात सध्या १०० रुपयांच्या स्टॅम्पचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली असून हे स्टॅम्प त्वरित उपलब्ध करून द्यावेत अशी, मागणी नागरिकांची आहे. दरम्यान करमाळा येथील उपकोषाधिकार कार्यालयाने याबाबत सोलापूर कोषाधिकार कार्यालयास कळवले असून पुढील आठवड्यात हे स्टॅम्प उपलब्ध होतील, असे उपकोषाधिकारी आर. पी, शिंदे यांनी बोलताना सांगितले आहे. राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी मुद्रांक शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १०० रुपयाच्या स्टॅम्पला ५०० रुपये नागरिकांना मोजावे लागणार आहेत.

### भाजप सदस्य नोंदणीत सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चेतनसिंह केदार सावंत यांचा सत्कार

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** राज्यभरात सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट घेऊन भाजपकडून राज्यभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सदस्य नोंदणी अभियान सुरू आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली संघटन पर्व अंतर्गत सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजप पक्ष वाढवण्याच्या दृष्टीने सदस्य नोंदणीसाठी महत्त्वाचे प्रयत्न सुरू आहेत. भाजप संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियानात सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात २ लाख ११ हजार ४७३ (६२.७५) सदस्य नोंदणी करीत राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात महायुतीचा एकही आमदार नसताना सदस्य नोंदणीत उल्लेखनीय कामगिरी केल्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांचा सत्कार केला.

विधानसभा निवडणुकीनंतर भाजपसह महायुतीला यश मिळाल्यानंतर भाजप सदस्य नोंदणीला गती आली आहे. सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात ३ लाख ३७ हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवून उतरलेल्या भाजपने जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली जवळपास २ लाख ११ हजार ४७३ इतक्या सदस्य नोंदणीपर्यंत मजल मारत राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. भाजप सदस्य नोंदणीला १ जानेवारीपासून सुरुवात झाली असून भाजपला वाढता प्रतिसाद पाहता भाजप सदस्य नोंदणीची तारीख १८ फेब्रुवारीपर्यंत करण्यात आली आहे. भाजपच्या राजकीय बेरजेनुसार प्रत्येक बूथवर किमान २०० भाजप सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले होते.

सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत पक्षस्तरावर प्रचंड काम करताना दिसत आहेत. जिल्ह्यात सदस्य नोंदणीची संख्या पक्ष वाढीसाठी महत्त्वाची आहे. वाड्या वस्त्यांवर जाऊन भाजप सदस्य नोंदणी करण्याचा प्रयत्न भाजप पदाधिकाऱ्यांचा सुरू आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी पदाधिकायी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जिल्ह्यातील गावे, आठवडा बाजार, घरोघरी, वाड्यावस्त्यांवर जावून सदस्य नोंदणी केली आहे. भाजप सदस्य नोंदणीसाठी लोकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. कार्यकर्ते देखील तितकेच उत्साही आहेत. या सदस्य नोंदणीच्या माध्यमातून शासकीय योजनेची माहिती त्या सदस्यापर्यंत पोहोचवली जाणार आहे. केवळ निवडणूक म्हणून नव्हे तर इतर वेळी देखील २४ तास नागरिकांची सेवा होणे या उद्दिष्टाने भाजपचे काम सुरू असल्याचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले. भाजपच्या पदाधिकाऱ्याकडून जिल्ह्यातील भाजप सदस्य नोंदणीची संख्या ही ४ लाखापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असून १९ फेब्रुवारीपर्यंत उद्दिष्ट पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. त्या मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी हेच भाजपचे यश असणार असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

## वैराग पोलिसांची कारवाई, ६. ८० लाखांचा मुद्देमाल जप्त



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** धाराशिव येथे कत्तलीच्या उद्देशाने मोठ्या जर्सी गाईंची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर वैराग पोलिसांनी तातडीने कारवाई करत १४ गाईंची सुटका केली. तसेच या प्रकरणी एका टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ४ फेब्रुवारी रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास रातंजन (ता. बार्शी) येथील बसस्थानकाजवळ करण्यात आली. एमएच-४३- यू-२७४७ क्रमांकाचा एक टेम्पो धाराशिव येथे कत्तलीसाठी गायी घेऊन जात आहे. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रातंजन बसस्थानकाजवळ नाकाबंदी करून संशयित टेम्पो अडवला.

» Selected

## 20 वाहनधारकांकडून दीड लाखांच्यावर दंड वसूल

**सोलापूर :** सोलापूर शहरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे व एक ट्राफिक अंमलदार यांच्या माध्यमातून मोबाईल टॉकिंगचे 54, ट्रिपल सीट 28, फ्रंट सीट रिक्षा चालवले 20 असे एकूण 102 ई-चलनाची दंडात्मक कारवाई सोलापूर शहरात विविध भागात करण्यात आली आहे. या कारवाईच्या माध्यमातून वाहनधारकांना एकूण 1, 69, 000/- रुपये रक्कम दंड करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर शहर वाहतूक शाखेकडून करण्यात आली.

## सरवदे नगर भागात रस्ता कॉंक्रिटीकरणाचा शुभारंभ



**सोलापूर :** सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून प्रभाग क्र. 11 सरवदे नगर भाग २ येथील मोमीन नगरातील कौसर पठाण यांचे घर ते सलाम तांबोळी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे (₹ ८. ४७ लाख) या विकासकामाचा शुभारंभ आमदार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सतीश भरमशेट्टी, दीपक जाधव, अंबादास व्हनकडे, समीर इनामदार, माजिद बागवान, वजिर शेख, अल्ताफ बागवान, जलानी बागवा, जाकीर बागवान, मुजाईत बागवान सोबतच विडी घरकुल येथील नागरिक उपस्थित होते.

## दुय्यम निबंधक कार्यलयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु



**करमाळा :** करमाळा येथील तहसील कार्यालयाच्या मागे दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्यावतीने (मुंबई) हे काम सुरु आहे. यासाठी १ कोटी ४७ लाख निधी मंजूर असून १२ महिन्यात याचे काम पूर्ण करयाचे आहे. हे काम झाल्यानंतर नागरिकांना चांगली सुविधा मिळणार आहे. करमाळ्यात निवडणूक कालावधी व एखादे आंदोलन असेल तर तहसील कार्यालयाचे प्रवेशद्वारे सर्वसामान्य नागरिकांसाठी बंद असते. त्यामुळे नागरिकांची दुय्यम निबंधक कार्यालयातील कामे होत नव्हते.

## माढ्यातील प्रश्नावर पालकमंत्र्यांशी चर्चा



**माढा :** जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबत माढ्यातील महात्मा फुले प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विविध प्रश्नासंदर्भात चर्चा केली. यावर पालकमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मांडलेल्या प्रश्नाची सोडवणूक करण्याची ग्वाही देत माढ्याला येण्याचा शब्द दिला. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आजिनाथ अप्पा माळी यांच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री यांच्या माण तालुक्यातील बोराटवाडीत घरी जाऊन त्यांचा सत्कार केला. माढ्यातील काही प्रश्न त्यांच्यापुढे मांडत ते सोडविण्याची मागणी केली.

## आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी खा. प्रणिती शिंदे यांना निवेदन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा समिती पंढरपूर यांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी सोलापूर लोकसभा खासदार मा.प्रणितीताई शिंदे यांना खासदार निधीतून देण्यासाठी आज सोलापूर येथे खा. प्रणितीताईंना भेटून निवेदन देण्यात आले. खा.प्रणितीताईंनी लोकशाहीर अण्णाभाऊंच्या पुतळा स्मारकाचे सुरू असलेल्या कामाची माहिती घेवून चर्चा केली व भरघोस निधी देण्याचे आश्वासन दिले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा समितीचे अध्यक्ष व मा. नगरसेवक नागेश भाऊ यादव,काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप पाटील व सागर वाघमारे उपस्थित होते.

## भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मोहोळ :** सोलापूर जिल्ह्यात मधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी अजित पवार यांची मुंबईमध्ये भेट घेतली. यावेळी उमेश पाटील यांचा अजित पवार यांच्या हस्ते सत्कार झाला. याप्रसंगी उपस्थित मान्यवर.


## राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिमेला मारले जोडे



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवाजी महाराज यांच्या बाबत मराठी अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सामर्थ्याची आणि कर्तुत्वाचे अवमूल्य केल्यामुळे राहुल सोलापूरकर यांनी तसे पुरावे द्यावेत अन्यथा त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. तसेच सोलापूरकर यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ त्यांच्या प्रतिमेला यावेळी जोडेमार आंदोलन करण्यात आले.

## नागरिकांनी अफवांना बळी पडू नये



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागासप्रवर्गातील नागरिकांना वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकडून कर्ज मिळवून देतो असे सांगुन रोख रक्कमेची मागणी केली जात आहे. महामंडळामार्फत कोणत्याही एजंट अथवा मध्यस्थाची नेमणूक केलेली नाही. नागरिकांनी सदर अफवांना बळी पडून कोणत्याही व्यक्तीशी आर्थिक देवाण घेवाण करू नये, असे आवाहन वसंतराव नाईक विकास महामंडळकडून करण्यात आले आहे.

## सोलापूर जिल्हयातील शिधापत्रिकाधारकांना आधार प्रमाणीकरण ई-केवायसी अनिवार्य-पुरवठा अधिकारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्हयातील रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीरकण ई केवायसी करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत. त्यानुसार सर्व शिधापत्रिकाधारकांनी आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करून घ्यावी असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

लाभार्थ्यांचे ई-केवायसी करण्याकरिता गावोगावी कॅम्प आयोजीत केले आहे. या करिता शिधापत्रिकेतील अर्थात कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या नजीकच्या रास्तभाव धान्य दुकानांमध्ये प्रत्यक्ष आधार कार्ड दाखवून, अंगठयाचा ठसा देऊन आधार प्रमाणीकरण ई-केवाससी करावयाचे आहे. सदरील प्रक्रिया दिनांक १५ फेब्रुवारीपर्यंत करावयाची असल्याने लाभार्थ्यांनी जवळच्या रास्तभाव धान्य दुकानामध्ये अथवा कॅम्पमध्ये जाऊन आपल्या अंगठ्याचा ठसा व आधार नंबर देऊन ई- केवायसी करावी. ई-केवायसी केले नाही, तर दिनांक १५ फेब्रुवारीनंतर धान्य दिले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी कॅम्प चा लाभ घ्यावा. या संदर्भात सर्व लाभार्थी व रास्तभाव धान्य दुकानदार यांना दिनांक १५ फेब्रुवारीपूर्वी १००% कामकाज पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

तसेच जिल्हयातील सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस अन्नदिन साजरा करुन लाभार्थ्यांना धान्य वाटप सुरु करावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये दर महिन्याच्या १५ तारखेपूर्वी सर्व लाभार्थ्यांना धान्य वाटप पूर्ण करावे. अशा सक्त सूचना देण्यांत येत आहेत. तसेच वन नेशन वन रेशनकार्ड अंतर्गत राज्यातील लाभार्थी नजीकच्या कोणत्याही रास्तभाव दुकानामध्ये जाऊन अन्नधान्याची उचल करीत आहेत. त्या लाभार्थ्यांनी त्याच दुकानामध्ये ई-केवायसी करुन घ्यावी. अन्यथा आपल्या गावी रास्तभाव धान्य दुकानात जाऊन ई-केवायसी करावी. केंद्र शासनाच्या ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थलांतरीत/असंघटीत कामगार ज्यांच्याकडे अद्याप रेशनाकार्ड नाही, अशा कामगारांना प्रचलित निकषानुसार विशेष मोहिमेअंतर्गत तातडीने शिधापत्रिका वितरीत करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.ई-श्रम पार्टलवर नोंदणीकृत स्थलांतरीत/असंघटीत कामगारांना जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयामध्ये सुरु आहे. त्यानुसार ज्या व्यक्तीनी स्वतःचे नाव ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत केलेले आहे. मात्र अद्याप कोणत्याही प्रकारच्या शिधापत्रिकेचा लाभ नाही, अशा व्यक्तींनी आवश्यक त्या कागदपत्रांसह जवळच्या तहसिल कार्यालयमध्ये संपर्क करुन शिधापत्रिका प्राप्त करुन घ्यावी.




### अंगणवाडी बालकांच्या सर्वांगीण

# विकासासाठी पंढरीत आरंभ; पालक मेळावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** कात्मिक बाल विकास प्रकल्प अंतर्गत घेण्यात आलेल्या आरंभ पालक मेळाव्याचे माध्यमातून अंगणवाडीतील बालकांचे सर्वांगीण विकासासाठी खेळ कृती, स्पर्श कृती, सोप्या पद्धतीने बौद्धिक विकास व्हावा यासाठी शासनाने नुकतेच आरंभ पालक मेळाव्याच्या माध्यमातून पालकांनी शून्य ते तीन वर्षे मुलांकडून घरातच सोप्या पद्धतीने खेळां मधून आपल्या बालकांचा विकास करुन घ्यावा यासाठी या मेळाव्यात विविध प्रकारच्या कृतीचे स्टॉल उभारण्यात आले होते.

प्रारंभी आरंभ पालक मेळाव्याचे उद्घाटन डॉक्टर संगीता पाटील यांनी केले. यानंतर एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव, मुख्य सेविका सारिका सनगर, प्रमुख पाहुणे डॉक्टर संगीता पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी बोलताना डॉ. संगीता पाटील म्हणाल्या की बालकांच्या आयुष्याची सुरुवात कशा प्रकारे व्हावी यासाठी आरंभ पालक मेळावा अतिशय स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक पालकाला वाटते आपली मुलं सुंदर असावेत सुदृढ असावेत तसेच बुद्धिमानही असावेत यासाठी शून्य ते तीन वर्षे वयापर्यंतच्या मुलांची जडणघडण वागणे बोलणे ही कृती मुलांवर किती परिणाम करते. अशा छोट्या छोट्या गोष्टीतून सर्व अंगणवाडी सेविकांनी स्टॉलच्या माध्यमातून दाखवले आहे. बालकांसोबत पालकही याचा आनंद घेत आहेत. आहाराच्या बाबतीतही सुंदर प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.यावेळी बोलताना बालविकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव म्हणाले की बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांचे खेळाकडे लक्ष केंद्रित करून आरोग्याच्या दृष्टीने त्यांना विकसित करण्यासाठी नवनवीन संकल्पना राबवून पालकांनी मुलांचे संगोपन कशा पद्धतीने करावे याची माहिती दिली. बालकांच्या मेंदूची वाढ ही पहिल्या दोन वर्षात साधारण ७५ टक्के होते. यावेळेस बालकाच्या आरोग्याबरोबरच सर्वांगीण विकासाकडे व बौद्धिक क्षमतेवर कृती करून घेणे आवश्यक आहे असेही सांगितले. यावेळी बोलताना मुख्य सेविका सारिका सनगर म्हणाल्या की आरंभ पालक मेळाव्याच्या माध्यमातून आरंभ संकल्पना राबविण्यात येत आहे. बालकांच्या सर्वांगीण विकास कशा पद्धतीने करावा हे प्रत्येक स्टॉलच्या माध्यमातून समजते. मोबाईलचा वाढता वापर कमी करण्यासाठी खूप साऱ्या संकल्पना राबवल्यास मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळेल अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.यावेळी पालकांकडून सदर आरंभ पालक मेळाव्याचे कौतुक करण्यात आले व असाच मेळावा वारंवार भरवावा अशी मागणी ही यावेळी करण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बीट क्रमांक एकच्या सर्व सेविका व मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

**सोलापूर :** देगाव येथील ओढ्या पलीकडील रेल्वे रुळावर धावत्या रेल्वेखाली कटल्याने तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. मंगळवारी सकाळी साडेआठ वाजण्यापूर्वी हा प्रकार उघडकिस आला. कालिदास पंडित राठोड (वय 32 राहणार बसवेश्वर नगर तांडा, देगाव ) असे मयत तरुणाचे नाव आहे. डॉक्टरांनी तपासणी करून उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

### दर्शन रांगेत भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध; पत्राशेड येथे अन्नछत्र

# माघ यात्रा :वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर प्रशासन सज्ज-औसेकर

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'माघ एकादशी मुख्य सोहळा दि. 08 फेब्रुवारी रोजी असून, यात्रा कालावधी दि.02 ते 12 फेब्रुवारी असा आहे. या यात्रेला सुमारे 4 ते 5 लाख भविक पंढरपूरात येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

माघी यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालीन मार्ग, विश्रांती कक्ष, दर्शन रांगेत बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा - खिचडी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत. यात्रेनिमित्त भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात येणार असून, त्यासाठी पुजांची संख्या कमी करून स.6.00 ते रा.12.00 पर्यंत दर्शन उपलब्ध राहणार आहे. दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविण्यासाठी अनुभवी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच या यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येणार असून, त्याबाबतचे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ह.भ.प. वासकर महाराज यांच्या दिंडीची नवमीला श्री.विठ्ठल सभामंडप येथे आरती व अभंग, ह.भ.प.आजरेकर महाराज पंढरपूर यांचा द्वादशीला नैवेद्य, त्रयोदशीला ह.भ.प.औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची परंपरा असून, एकादशीला पहाटे



श्रींची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य महोदयांच्या शुभहस्ते सपत्नीक संपन्न होत आहे. याशिवाय, सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यांसह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक 100 सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच माळवदावर वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. तसेच मयत भाविकांचे त्याच्या मुळगावी शव पोहोच करण्यासाठी मोफत शववाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्वच्छतेसाठी विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून, मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा इ. ठिकाणची स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्दतीने करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत आहे. श्री.संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये दु.12.00 ते 2.00 व रा.7.00 ते 9.00 या वेळेत अन्नदान सुरू राहणार असून, दर्शनरांगेत नवमीपासून चहा-शाबुदाणा, तांदळाची खिचडी तसेच पत्राशेड येथे दशमी, एकादशी व द्वादशीला अन्नछत्र सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंदिर समितीचे संकेतस्थळ (www. vitthalrukminimandir.org), मोबाईल ॲप ("श्री.विठ्ठल रूक्मिणी देवस्थान, पंढरपूर") वरून श्रीचे लाईव्ह दर्शन उपलब्ध असून पत्राशेड दर्शन रांग व मंदिर परिसरात एल.ई.डी. स्क्रिन बसविण्यात येत आहे. याशिवाय, देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी QR CODE, RTGS, सोने-चांदी वस्तु दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष, चेंजिंग रूम तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडूप्रसाद व त्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व श्री.विठ्ठल रूक्मिणी या 3 भक्तनिवासामधील 361 रूममध्ये सुमारे 1600 भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे. सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व वारकरी भाविकांना केंद्र बिंदू मानून त्यांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य सर्वश्री आ.रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ॲड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे परिश्रम घेत असून सुमारे 1800 कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी दिली.

» पान १ वरुन

## दिल्लीचे तख्त भाजपकडेच!

स्ट्रॅटेजीनुसार, आपला 25 ते 28 जागांवर यश मिळण्याची शक्यता आहे. तर काँग्रेसला 2 ते 3 जागांवर समाधान मानावे लागण्याची शक्यता आहे. तर भाजप मोठी मुसंडी मारण्याची शक्यता आहे. भाजपला या निवडणुकीत 39 ते 44 जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे.

दिल्लीत विधानसभा निवडणुकीत खरी लढत ही आम आदमी पार्टी अर्थात आप, काँग्रेस आणि भाजप यांच्यात आहे. आपने या निवडणुकीत आपलं अस्तित्व अबाधित राहावं यासाठी प्रचंड प्रयत्नांची पराकष्ठा केली. तर भाजप आणि काँग्रेसने देखील प्रचंड ताकद लावली. याशिवाय बसपा आणि असदुद्दीन ओवैसी यांच्या एमआयएम पक्षाने देखील काही जागांवर निवडणूक लढवली. त्यामुळे या निवडणुकीला प्रचंड रंगत आलेली बघायला मिळाली. या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाची एकहाती सत्ता येईल, असे स्पष्ट दिसत आहे.

## शिरीष महाराज मोरे यांची आत्महत्या

शिरीष महाराज यांनी आत्महत्येपूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. त्यात त्यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. शिरीष महाराज हे संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज होते. तसेच त्यांचे निगडी येथे इडली उपहारगृह देखील होते. त्यांच्या पश्चात आई आणि वडील असा परिवार आहे. नुकताच त्यांचा टिळा झाला होता. २० फेब्रुवारीला रोजी मोरे यांचा विवाह होणार होता. आत्महत्येच्या घटनेमुळे देहूगावावर शोककळा पसरली आहे. घटनेचा अधिक तपास देहूरोड पोलीस करत आहेत.

» Selected

## भाजपा सदस्य नोंदणीत 'अक्कलकोट' अव्वल!

**अक्कलकोट :** भारतीय जनता पक्षाचे सदस्यता नोंदणी अभियान संपूर्ण राज्यभर मोठ्या उत्साहात राबविले जात आहे. त्याच धर्तीवर, आपल्या अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात देखील सदस्यता नोंदणी अभियान राबविण्यात आले. या सदस्यता नोंदणी अभियानात पक्षामार्फत देण्यात आलेले सदस्यता नोंदणीचे १०० टक्के उद्दिष्ट सर्वात आधी आपल्या अक्कलकोट मतदारसंघात पूर्ण झाले आहे. सर्वाधिक नोंदणीसह आघाडीवर असून या दोन्ही यशाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निकचे स्पोर्ट्स मध्ये ही वर्चस्व कायम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** इंटर इंजिनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट असोसिएट आयोजित सी- झोन खो-खो स्पर्धेमध्ये कर्मयोगी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी सलग तिसऱ्या वर्षी ही आपले वर्चस्व कायम ठेवून विजेतेपद पटकविले आहे. अंतिम सामन्या मध्ये शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज या संघावर एक डाव दोन गुणांनी विजय संपादित केला आहे. या स्पर्धा स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सोलापूर येथे पार पडल्या. यामध्ये कर्मयोगी पॉलिटेक्निक कॉलेजचे खेळाडू रामचंद्र ढोबळे, गौरव खेडेकर, रितेश पाटील , रुपेश पाटील ,ओम उपाशे ,प्रवीण उपाशे ,चैतन्य वाघ. सिद्धेश्वर जवळेकर, ओमराज खेडेकर प्रसाद जाधव, चेतन कदम, श्रीराम कुलकर्णी, प्रेम धांडे, कृष्णा मोरे, प्रफुल पवार यांनी चमकदार कामगिरी करत यश संपादन केले. आता कर्मयोगी संघाचे महाराष्ट्र राज्य स्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक कॉलेज येथे झालेल्या हॉलीबॉल मुलींच्या स्पर्धेमध्ये कर्मयोगी पॉलिटेक्निक कॉलेजच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले आहे. त्यामध्ये आरती जाधव ,वैष्णवी जाधव, कोमल पवार, पुष्पांजली केसकर, मुक्ता शिंदे, आकांक्षा पाटील, गौरी वराडे, गौरी होनमाने यांनी सहभाग नोंदवला. श्री पांडुरंग प्रतिष्ठान चे विश्वस्त मा.रोहन परिचारक, कर्मयोगी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अजित कणसे. इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील, रजिस्ट्रार गणेश वाळके यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या सर्व खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक बी जे साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

## देणगी...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस मंगला मारूती पाटील रा.ठाणे यांनी 2 लाख 51 हजार रूपयांची देणगी धनादेश स्वरूपात दिली. सदरची देणगी देणगीदार यांचे पती मारूती पाटील यांनी आज श्री विठ्ठल - रूक्मिणी मंदिरात उपस्थित राहून दिली आहे. त्याबद्दल देणगीदार भाविकांस श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन मंदिर समितीचे लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांनी सन्मान केला. याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## वसंतराव काळे आयटीआय कॉलेजमध्ये व्याख्यानाचे आयोजन




**पंढरपूर :** येथील वसंतराव काळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था धोंडेवाडी येथे वसंतराव (दादा) काळे यांच्या 81 जयंतीनिमित्त सोलर एक्यूमेंट ग्रीन एनर्जी सोल्युशन चे डायरेक्टर अभिजीत बेके सर रिनेव्हेबल एनर्जी सोलर या विषयावर व्याख्यान पर मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री कल्याणराव काळे हे होते आपल्या मनोगतामध्ये सांगितले की विद्यार्थ्यांनी काळाची पावले ओळखून आपल्या क्षेत्रात स्किल संपादन करून स्वतःचा सर्वांगीण विकास केला पाहिजे असे सांगितले.यावेळी अभिजीत बेके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना सोलर एनर्जी, सोलर प्लेट, सिलिकॉन धातू,सेल याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थीचा प्रश्नाचे उत्तरे देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला. एम.मॅटिक आटोमेशन सोल्युशन च्या डायरेक्टर मनिजा वाडेर यांनी ऑटोमेशनचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयटीआय कॉलेजचे प्राचार्य संतोष गुळवे सर यांनी केले संस्थेच्या विकासात्मक धोरणाची माहिती सांगून येणाऱ्या काळाची गरज ओळखून वसंतराव काळे आयटीआय मध्ये सोलर टेक्निशन या कोर्सची सुरुवात केली आहे या कोर्सच्या ग्रामीण भागातील मुलांनी स्वतःचा व्यवसाय निर्माण करून देण्याची संधी दिली आहे असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि अनिल ननवरे यांनी केले यावेळी संस्थचे सचिव चंद्रकांत कुंभार, अजय बेके सर,अर्जुन बापू जाधव, सुरेश काळे, व सर्व निदेशक वर्ग उपस्थित होते.

# शुक्रवारी हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर पासून पंधरा ते वीस मिनिट अंतरावर असलेल्या करकंब नजीक उभारण्यात आलेल्या हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी या पंचतारांकित हॉटेलचे उद्घाटन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार असून या कार्यक्रमासाठी माजी गृहमंत्री बाळ नांदगावकर, भाजपाचे पक्षनेते प्रवीण दरेकर, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, शिवसेनेचे शिवाजी सावंत, मनसेचे अनिल शिदोरे, अविनाश अभ्यंकर, सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले उपस्थित राहणार असल्याची माहिती मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली. देशभरातून भाविक पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येत असतात या येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी. या उद्देशाने पंढरपूर पासून पंधरा ते वीस मिनिट अंतरावर असलेल्या करकंब नजीक मनसे नेते दिलीपबपू धोत्रे यांच्या संकल्पनेतून हॉटेल ग्रँड या पंचतारांकित हॉटेलची १ लाख ४ हजार स्क्वेअर फुट जागेत निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये ५० रूम, तीन हजार स्क्वेअर फुटचा हॉल, पंचवीस हजार स्क्वेअर फुट लॉन, स्विमिंग पूल, प्रशस्त पार्किंगची सोय करण्यात आली आहे. याचबरोबर हॉटेल श्रीयश रेस्टॉरंटची मुंबईच्या धरतीवर निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये पंचतारांकित हॉटेल प्रमाणे विविध प्रकारच्या जेवणाचे मेनू मिळणार आहेत. याद्वारे १०० तरुणांना रोजगार मिळणार असल्याची माहिती मनसेनेचे दिलीप धोत्रे यांनी दिली.






## महापालिकेच्या प्रारुप विकास आराखड्यावर 2763 हरकती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या सुधारित विकास योजनेच्या प्रारूप आराखड्यावर 2763 हरकती आल्या आहेत. या हरकतींवरील सुनावणीसाठी राज्य शासनाकडून समिती गठीत होणार आहे. ही समिती या हरकतींवर सुनावणी घेईल असे महापालिकेच्या नगररचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णुरकर यांनी सांगितले.

मुख्याधिकारी यांजकडून

### पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 61 (1) अनुसार जाहीर सुचना**

ज्याअर्थी, पंढरपूर नगरपरिषदेने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 ( यापुढे उक्त अधिनियम असे उल्लेखिलेले) चे कलम 60 (1) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करुन नगर परिषद हद्दीतील क्षेत्रापैकी नकाशात दाखविलेल्या क्षेत्रासाठी, प्रारुप नगर रचना योजना पंढरपूर क्रमांक 1 ( यापुढे उक्त योजना असे उल्लेखिलेली) तयार करावयाचा इरादा दिनांक 22/09/2023 च्या प्रशासकीय सभा ठराव क्रं. 382 अन्वये जाहीर केलेला असून, त्यासंबंधीची उद्घोषणा महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक 12/10/2023 रोजी पृष्ठ क्रं.01 वर तसेच दैनिक पुण्यनगरी मध्ये दिनांक 07/10/2023 रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 61 (1) मध्ये विहित केल्यानुसार नगर परिषदेने उक्त प्रारुप नगर रचना योजना तयार करुन, इरादा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून नऊ महिन्याच्या कालमर्यादेत म्हणजे दि. 12/07/2024 पर्यंत (ठरावापासून ९ महिन्यात) प्रसिद्ध करणे जरुरीचे आहे.

आणि ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टीपीसए-1813/3211/CR-508/UD-13, दिनांक 01/12/2016 अनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी उक्त अधिनियमाचे कलम 61 (3) अनुसार, उक्त योजना तयार करुन नोटीस प्रसिद्ध करण्याची मुदत त्यापुढे 3 महिने म्हणजे दिनांक 09/02/2025 पर्यंत वाढविलेली आहे;

आणि ज्याअर्थी, पंढरपूर नगर परिषदेने उक्त योजना तयार करण्यासाठी उक्त अधिनियमांच्या तरतुदीनुसार जे करावयास पाहिजे होते ते सर्व करुन, उक्त योजना आता नगर परिषदेने तयार केलेली आहे.

त्याअर्थी आता उक्त अधिनियमाचे कलम 61 (1) व त्याखालील नियमानुसार सुचना करण्यात येत आहे की, सदरहू प्रारुप नगर रचना योजना पंढरपूर क्रं.1 पंढरपूर नगरपरिषदेचे प्रशासकीय ठराव क्रं.899 दिनांक 31/01/2025 अन्वये नगरपरिषदेच्या कार्यालयामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे.

उक्त योजनेचे नकाशा व अहवाल नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांचे अवलोकनार्थ खुले ठेवण्यात आले आहे. तसेच नागरिकांना उक्त योजनेच्या नकाशाची किंवा अहवालाची प्रत किंवा त्यातील भागाची प्रत निश्चित मूल्य नगर परिषदेकडे भरल्यानंतर विक्रीसाठी उपलब्ध होईल;

तरी आता, वरील सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत, उक्त प्रसिद्ध केलेली योजनेमुळे बाधा पोहचलेल्या कोणत्याही इसमाने उक्त योजनेसंबंधी कोणताही लेखी आक्षेप ( दोन प्रतीत) मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिष यांचे नांवे कार्यालयात सादर करावे, म्हणजे उक्त योजना नगर परिषदेतर्फे उक्त अधिनियमाचे कलम 68 (1) च्या तरतुदीनुसार शासनास मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी, उक्त अधिनियमाच्या कलम 67 अनुसार योग्य त्याप्रमाणे त्यांचा विचार, करण्यात येईल व आवश्यक ते उक्त योजनेत फेरफार करण्यात येईल. याची कृपया नागरिकांनी नोंद घेऊन, नगर परिषदेस सहकार्य करावे.

**( डॉ. प्रशांत अनंत जाधव )**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर,**
**जिल्हा सोलापूर**

दिनांक :-

### BY CHIEF OFFICER
### PANDHARPUR MUNICIPAL COUCIL, PANDHARPUR

**Notice under section 61(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act.1966**

Whereas the Pandharpur Municipal Council in accordance with the provisions of section 60 (1) of the Maharashtra Regional and Town Plannning Act 1966, (Maharashtra Act no. XXXVII of 1966) (hereinafter referred to as the said Act) declared it's intention to prepare the draft Town Planning Scheme Pandharpur No. 1 ( hereinafter referrd to as the said scheme) vide it's General Body resoluction No. 382 dated 22/09/2023 and published a declaration to that effect in the Maharashtra Government Gazette Pund Division supplement part 1 dated 12/10/2023 to 18/10/2023 and in the daily newspaper Dainik Punyanagari dated 07/10/2024;

And whereas in accordance with the provisions of section 61 (1) of the said Act, the Pandharpur Municipal Council has to prepare and publish the said scheme within a period of nine months from the date of declaration of interntion to prepare the scheme, i.e. on or before 12/07/2024;

And whereas in accordance with the provisions of section 61 (3) of the said Act, the Joint Director of Town Planning, pune Division, Pune, vide his order no. 042, dated, 10/01/2025 in exercise of the powers delegated to him under Government Notification in Urban Development Department No. TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 01/12/2016 has further extended 3 month's time period till date 09/02/2025, for preparing the said scheme and publishing a notice regarding its preparation;

And whereas the Municipal Council has now prepared the said draft scheme in accordance with the provisions of the said Act and rules framed there under;

Now, therefore, under the provisions of section 61 (1) of the said Act, the said draft scheme has been published in the office of the Municipal Council vide Administrative Resolution No. 899 Dated 31/01/2025;

A copy of the said draft scheme and plans thereof are kept open for inspection by the public during office hours on all working days in the office of the Municipal Council. A copy of he plan and scheme book of the said scheme or part thereof can be obtaine after payment of the prescribed fees;

In accordance with the provisions of section 67 of the said Act, if within thirty days form the date of publiction of this notice in the Maharashtra Government Gazette, any person affected by the said scheme communicates in writin (in duplicate) any objections relating to the said scheme to the Cheif Officer, the Municipal Council shall cousider the same and modify the said draft scheme as it thinks fit, before submitting the said draft scheme under section 68 (1) of the said act, to the Government for sanction.

**(Dr. Prashant Anant Jadhav)**
**Cheif Officer**
**Pandharpur Municipal Council,**
**Pandharpur, District Solapur.**

Date :-

संपादकीय विशेष

# कामाच्या तासांचे गणित

कामाचे तास ठरवताना कामाची गुणवत्ता, सातत्य, परिणामकारकता तपासली पाहिजे. त्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा. देशाच्या प्रगतीसाठी सर्वच घटकांनी हातभार लावायला हवा. केवळ कामगारांवर जबाबदारी ढकलून कॉर्पोरेटजगताला मोकळे होता येणार नाही. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास आणि प्रगती होण्यासाठी युवावर्गाचा हातभार असला पाहिजे, याबाबत दुमत नाही. भारतासारख्या देशात बेरोजगारीचे प्रमाण अधिक असताना निवृत्तीचे वय वाढवणे, कामाचे तास वाढवणे यामुळे देशाच्या प्रगतीला किती हातभार लागतो हा संशोधनाचा भाग आहे; परंतु एका घटकाचे कामाचे तास, नोकरीचे वय वाढवताना रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या कोट्यवधी हातांना काम मिळण्यापासून वंचित ठेवले जाते, हे अनेक महाभागांच्या लक्षात येत नाही. अलिकडच्या काळात शहरे फुगली आहेत. कामाचे ठिकाण एका बाजूला तर राहण्याचे ठिकाण शहरांच्या दुसऱ्या बाजूला असते. वाहनांच्या वाढलेल्या संख्येमुळे दररोज वाहतूक कोंडीतून मार्ग काढावा लागतो. मुंबईसारखी सार्वजनिक वाहतूक सेवा सर्वच ठिकाणी उपलब्ध नसते. दररोज प्रवासात तीन-चार तास जात असतील, कामाचे आठ तास, झोपेचे आठ तास धरले, तर व्यक्तिगत कारणांसाठी फक्त चार-पाच तास उरतात. सध्याच्या युगात महिलाही नोकऱ्या करतात. त्यांना स्वयंपाकासह अन्य कामे करावी लागतात. कामाचे काही तास वाढवले, तर त्यांच्या वेळेचे गणित कसे जमणार, याचा विचारच महानुभवांनी केलेला नाही. चांगली झोप झाली, तर कर्मचारी काम करू शकतो. कुटुंबाला वेळ देऊ शकला, तर जास्त आनंदी वातावरणात काम करू शकतो. त्यातही किती तास काम केले यापेक्षा किती गुणवत्तेचे केले, हे पहायला हवे. गुलामगिरी करायला लावून बळजबरीने जास्त काम करायला लावल्यास कामगार मन लावून काम करण्याऐवजी पाट्या टाकण्याचे काम करतील.

या पार्श्वभूमीवर 'लार्सन अँड टुब्रो'चे अध्यक्ष एस. एन. सुब्रमण्यम आणि इन्फोसिसच्या नारायण मूर्तींनी दिलेला नव्वद आणि सत्तर तास कामाच्या सल्ल्याकडे पहावे लागेल. या दोघांच्या विधानांनी भारतीय राजकीय-आर्थिक परिस्थिती हादरली. ४४ कामगार कायदे जवळजवळ रद्द झाल्यानंतरही नोकऱ्या निर्माण करण्यास कॉर्पोरेटसची अनिच्छा आहे. सुब्रमण्यम म्हणतात की प्रत्येकाने दिवसाचे १५ तास काम केले पाहिजे, जे शिकागोच्या स्वीकारलेल्या आठ तासांच्या मॉडेलच्या दुप्पट आहे. दुसऱ्या शब्दांमध्ये एक पेमेंट मिळवण्यासाठी त्यांनी सलग दोन शिफ्टमध्ये काम केले पाहिजे. मूर्ती यांनी दररोज दहा तासांच्या वेळापत्रकाची कल्पना केली आहे. ते म्हणतात, तरुणांच्या जीवावर आणि मेहनतीवरच देश महान होईल. या दोघांच्या विधानांचा परामर्श घेतला तर ते लोकांचा आठ तास झोपेचा आणि आठ तासांच्या वैयक्तिक आणि सामाजिक समृद्धीचा अधिकार हिरावून घेतात. कामगारांच्या हिताची नाही, तर फायद्याची काळजी करणाऱ्या कॉर्पोरेटसच्या लहरीपणापुढे नतमस्तक होण्यासाठी सरकारचे संगनमत किंवा मजबुरीही यातून समोर येते.

वर्षानुवर्षे कामगारांना कामाचे दीर्घ तास, कमी वेतन आणि कामाच्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. त्यांना घरातूनही रात्रंदिवस काम करावे लागत आहे. कंपन्याही त्यांच्या घरातील जागा ऑफिसच्या कामासाठी वापरतात. त्यामुळे घरातील शांतता भंग पावते; परंतु घरातील सुविधांच्या वापरासाठी कंपन्या त्यांना कधीही पैसे देत नाहीत. काही कंपन्या त्यांच्या घराच्या गोपनीयतेचे उल्लंघन करून त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी कॅमेरेदेखील बसवतात. अर्थात या नोकऱ्या असतानाही देशात रिक्त पदांचा अभाव आहे. सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अधिकाधिक नोकऱ्या निर्माण करू इच्छिणाऱ्या देश आणि सरकारच्या विरोधात हे पाऊल आहे.

सध्या भारतात सर्वात जास्त चर्चेत असलेली बाब म्हणजे मोठमोठ्या कंपन्यांच्या मालकांनी दर आठवड्याला कामाचे तास वाढवण्याबाबत केलेली विधाने. एकापाठोपाठ एक अनेक व्यापारी, उद्योगपती या विषयावर मते मांडत आहेत. भारतात गेल्या दोन वर्षांपासून या मुद्द्यावर चर्चा सुरू आहे. याची सुरुवात 'इन्फोसिस'चे प्रमुख नारायण मूर्ती यांच्या विधानाने झाली. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या आकडेवारीनुसार, भारत अशा देशांपैकी एक आहे, जिथे लोकांचे कामाचे तास सर्वाधिक आहेत. दक्षिण आशियाई देशांमध्येही भारतातील लोक सर्वाधिक काम करतात. भारतातील लोक दर आठवड्याला सरासरी 46.7 तास काम करतात. यासंदर्भातील डेटा दर्शवतो की 51 टक्के भारतीय कामगार दर आठवड्याला 49 तासांपेक्षा जास्त काम करतात. या बाबतीत भूतान अव्वल आहे. तिथे 61 टक्के कामगार दर आठवड्याला 49 तासांपेक्षा जास्त काम करतात. त्या तुलनेत बांगलादेशमधील केवळ 47 टक्के कामगार आणि पाकिस्तानातील 40 टक्के कामगार दर आठवड्याला 49 तास किंवा त्याहून अधिक काम करतात. वानुआतु हा ओशनियामधील एक बेट देश अशा देशांपैकी एक आहे, जिथे कर्मचाऱ्यांचे कामाचे तास सर्वात कमी आहेत. येथे लोक आठवड्यातून फक्त 24.7 तास नोकरीमध्ये घालवतात. एवढेच नाही तर, केवळ चार टक्के कामगार आठवड्यातून 49 तास किंवा त्याहून अधिक काम करतात.

याशिवाय ओशनिया, किरिबाटी आणि मायक्रोनेशिया या दोन देशांमध्ये कर्मचाऱ्यांचे सरासरी कामाचे तासही सर्वात कमी आहेत. किरिबाटीमधील कामगार दर आठवड्याला केवळ 27.3 तास काम करतात, तर मायक्रोनेशियामध्ये दर आठवड्याला 30.4 तास काम करतात. दोन्ही देशांमध्ये अनुक्रमे फक्त दहा आणि दोन टक्के लोक आठवड्यातून 49 तासांपेक्षा जास्त काम करतात. आफ्रिकन देश रवांडा आणि सोमालियामधील कामगार दर आठवड्याला 30.4 आणि 31.4 तास काम करतात. सर्वात कमी काम करणाऱ्या शीर्ष दहा देशांमध्ये नेदरलँड आणि कॅनडा यांचा समावेश आहे. तपशिलात सांगायचे तर कृषी, रोजगार, सर्वसमावेशक वाढ, उत्पादन आणि सेवा, शहरी वाढ, ऊर्जा, पायाभूत सुविधा, नावीन्य/संशोधन आणि विकास आणि पुढील पिढीतील सुधारणा या नऊ मूलभूत स्तंभांवर आधारित अर्थसंकल्प ची प्रक्रिया नाकारण्याचे हे एक पाऊल आहे. हे लोक मानसिक आरोग्य आणि विश्रांती गांभीर्याने घेत नाहीत हे दुःखदायक आहे. सुब्रमण्यम यांच्या तासांच्या वक्तव्यामागे कॉर्पोरेट जगताची मोठी चाल लपली आहे. सरकारला सावधपणे पावले उचलावी लागतील. महागाई वाढण्याच्या सुरुवातीच्या जोखमीमध्ये कॉर्पोरेट नफा हा एक प्रमुख घटक होता. गेल्या चार वर्षांमध्ये जीडीपी वाढीच्या तुलनेत कॉर्पोरेट नफ्यात साडेतीनपट वेगाने वाढ झाली आहे; मात्र कर्मचाऱ्यांच्या पगारात महागाईच्या दरानुसार वाढ झालेली नाही. नफ्याकडे दुर्लक्ष झाल्याने गरिबांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. घर, शुद्ध पाणी, पौष्टिक अन्न आणि आरोग्यसेवा या मूलभूत गरजा अनेक लोकांच्या आवाक्याबाहेर आहेत. अत्यावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी कुटुंबे अधिकाधिक कर्जावर अवलंबून रहात आहेत. कॉर्पोरेट्सना मूलभूत कामगार नियमांचे पालन करण्यास आणि मनमानी टाळेबंदी थांबवण्यास सांगण्याची ही एक संधी आहे. थोडासा कठोरपणा अनेक परिस्थितींचे निराकरण करू शकतो आणि अधिकृत यंत्रणेतील दोष दूर करू शकतो.

# गान सम्राज्ञी : भारतरत्न लता मंगेशकर

**आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे.**

गानकोकीळा
श्याम ठाणेदार,
पुणे

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे.

लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले.

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली.



मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले.

एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले.स्वरांची दैवी देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम हवी

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. शहरातील मध्यभाग, उपनगर, पेठांसह बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी वाढली आहे. या ठिकाणांहून वाहन चालकांना मार्ग काढणे, आणि नागरिकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीने दररोज पुणेकरांना जीव मुठीत धरावा लागत आहे. त्यामुळे पुणेकर अक्षरशः वैतागले असून पुण्यातील या वाहतूक कोंडीत पुणेकरांचा श्वास घुसमटत आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीवर आता जगाने ही शिक्कामोर्तब केले आहे. टॉम टॉम या जागतिक संस्थेने जगातील ६२ देश आणि ५०० शहरांमधील रहदारीची माहिती संकलन करून ट्रॉफीक इंडेक्स २०२४ नावाचा अहवाल सादर केला. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पाच शहरांमध्ये कोलाकोता, बेंगळुरू आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. या अहवालात सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात कोलकाता दुसऱ्या तर पुण्याचा चौथा क्रमांक लागत असल्याचे नमूद केले आहे.



जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात पुण्याचा चौथा क्रमांक लागतो ही पुणेकरांसाठी भूषणावह बाब नसून चिंताजनक बाब आहे.

पुण्यातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहा किलोमीटरच्या प्रवासासाठी पुणेकरांना ३३ मिनिटे २२ सेकंद लागतात. पुणेकरांचा सर्वाधिक वेळ हा प्रवासातच जातो. पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे वाहनांची बेसुमार वाढती संख्या. एकेकाळी सायकलींचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे दरवर्षी त्यात भरच पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे रस्ते अपुरे पडत आहे. अरुंद रस्ते आणि त्यावर फोफावलेली अतिक्रमणे यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडीत भरच पडत आहे. पुण्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी साधारणपणे एक हजार वाहतूक पोलीस रस्त्यावर असतात. पुणे शहराचा विस्तार मुंबईपेक्षा जास्त आहे. वाहतूक पोलिसांना उपलब्ध मनुष्यबळात काम करावे लागते. वाहतूक कोंडीला पोलिसांना दोषी ठरवले जाते. मात्र यात पोलिसांचा काहीही दोष नाही.

पुण्यातील वाहतूक कोंडी रोखायची असेल वाढत्या वाहनांना आळा घालवा लागेल आणि वाढत्या वाहनांना आळा घालायचा असेल तर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. जर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल आणि वाढत्या वाहनांना आळा बसला की वाहतूक कोंडीही कमी होईल आणि वाहतूक कोंडी कमी झाली की पुणेकरांना मोकळा श्वास घेता येईल.




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक करार लाभदायक ठरतील. चोरीबाबत सावधगिरी बाळगावी. प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **वृषभ** : व्यापारवृध्दीसाठी अनुकूलता राहील. जुनी येणी विनासायास वसूल होतील. प्रवासात काळजी घ्या.
- **मिथुन** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. मनाविरूध्द घटना संभवतात. बेरोजगारांना संधी लाभतील.
- **कर्क** : सुखद वार्ता कानी येईल. रखडलेली कामं मनाजोगी होतील. विवाहाच्या प्रयत्नांना चालना मिळेल.
- **सिंह** : अपेक्षित फलप्राप्तीचे योग आहेत. घाईगडबडीने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर सौख्य लाभेल.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा असेल. अचानक धनलाभ संभवतो. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **तूळ** : मोठे व्यवहार टाळावेत. स्थापत्य, अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील. कलागुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : धरसोडीचं धोरण टाळावं. आपलंच खरं हा अट्टाहास ठेवू नये. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.
- **धनु** : कौटुंबिक बाबतीत चिंता राहील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. अपेक्षित भेटीबाबत विचारानं रहावं.
- **मकर** : कारकिर्दीत नव्या संधी लाभतील. वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **कुंभ** : कौटुंबिक वाद वाढवू नयेत. भागीदारी व्यवसायात विचारानं रहावं. महत्त्वाचे करार मनाजोगे होतील.
- **मीन** : स्वमताग्रह टाळायला हवा. खऱ्या हितचिंतकांची योग्य पारख करा. वाढत्या खर्चाला आवर घालावा.

सल्ला मोलाचा

## घालवा नकोसे गवत

बागेमध्ये सतत उगवणारं गवत ही एक डोकेदुखी असते. झाडांच्या आसपास वाढणारं गवत सतत कापावं लागतं, अन्यथा झाडांच्या वाढीवर विपरित परिणाम दिसून येतो. कापल्यानंतर काही दिवसातच गवत पुन्हा वाढतं. म्हणूनच यावर कायमस्वरूपी इलाज शोधावा. काही घरगुती उपायानं हे साधता येतं. ✻ अनावश्यक गवत नाहीसं करण्यासाठी व्हाईट व्हिनेगरचा उपयोग होतो. १ मग पाण्यात १ कप व्हाईट व्हिनेगर घाला. गवत कापल्यानंतर त्या जागी हे पाणी शिंपडा. यामुळे त्या जागी गवत पुन्हा उगवणार नाही. ✻ झाडापाशी गवत नको असेल तर मीठ घालून ठेवावं. यामुळे आजूबाजूला गवत उगवत नाही. ✻ कापलेल्या गवतावर ब्लीच पावडर भुरभुरल्यास गवत उगवत नाही. ✻ गवतावर अल्कोहोल ओतल्यासही ते जळून जातं आणि पुन्हा उगवत नाही. ✻ गवत वाढू नये यासाठी उकळतं पाणी टाकणं हा देखील एक चांगला पर्याय आहे. यामुळे गवत होरपळतं आणि पुन्हा उगवत नाही. उन्हामुळे करपलेलं गवत जाळून टाकावं. यामुळे जमीन सकस बनते.

## ६ फेब्रुवारी — दिनविशेष

- १९३९ : बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचं निधन.
- १९४० : नॉर्वेच्या सागरी हद्दीत आश्रयास असणाऱ्या जर्मन तेलवाहू नौकेवरील ३०० ब्रिटिश खलाशांची एच.एन.एस. कोर्सेक या विनाशिकेने सुटका केली.
- १९४४ : चित्रपटसृष्टीचे जनक समजले जाणारे धुंडिराज गोविंद उर्फ दादासाहेब फाळके यांचे निधन.
- २०१४ : सिद्ध समाधी योगवर्गाचे गुरू श्री ऋषी प्रभाकर यांचं निधन.

महत्त्वपूर्ण काही...

## अशी असते हातांची क्षमता

दोन्ही हातांनी एका वेळी काम करणं अवघड असतं. आपण जवळपास प्रत्येक काम उजव्या हाताने करतो. डावखुऱ्या व्यक्ती डाव्या हाताचा वापर करतात. लिहिण्याचं काम आपण एकाच हाताने करतो. पण काही लोकांमध्ये दोन्ही हातांनी काम करण्याची क्षमता असते. वैद्यकीय भाषेत या क्षमतेला 'एम्बिडेक्सटेरिटी' म्हटलं जातं.

एम्बिडेक्सटेरिटी म्हणजे दोन्ही हातांनी काम करण्याची क्षमता. यामुळे एखादी व्यक्ती दोन्ही हातांवर सारखंच नियंत्रण ठेऊ शकते. टेनिस, मार्शल आर्ट यासारख्या खेळांमध्ये तसंच विशिष्ट प्रकारची वाद्यं वाजवताना ही क्षमता उपयुक्त ठरते. वैद्यकशास्त्रानुसार उजव्या हातानं काम करणाऱ्या व्यक्तींच्या मेंदूचा डावा भाग अधिक कार्यरत असतो तर डावखुऱ्या व्यक्तींच्या मेंदूचा उजवा भाग अधिक कार्यरत असतो. पण एम्बिडेक्सटोरिटीमध्ये दोन्ही भाग समान पद्धतीने कार्यरत राहतात. ही क्षमता जन्मत: मिळत असली तरी अनेकजण सरावानं ती विकसित करू शकतात. दोन्ही हातांनी काम करणाऱ्या व्यक्ती जास्त कल्पक असतात. याचे काही फायदे असले तरी याचे तोटेही असतात.

## पंचांग

**गुरूवार, ६ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ९, नक्षत्र : कृत्तिका
चंद्रराशी : वृषभ, ब्रह्मा योग,
सूर्योदय : ७.११, सूर्यास्त : ६.३४

## फॉरवर्डस

प्रेमात पडणाऱ्यांची, त्यापायी विव्हळ होणाऱ्यांची संख्या वाढतेय.

**शायरी करनेवाले बढते जा रहे है,**
**ए-मोहब्बत लगता है, तेरा धंदा जोरोपर है।**

आरोग्यमंत्र

## ...म्हणून होतं विस्मरण

वैद्यकीय शास्त्रात झालेल्या प्रगतीमुळे मानवी मेंदूतील घडामोडी, त्यातील यंत्रणांची नेमकी माहिती या संदर्भात बऱ्याच बाबींवर प्रकाश टाकणं शक्य झालं आहे. खरं तर वाढत्या वयानुसार आपल्या मेंदूतही बरेच बदल घडत असतात. हेच बदल स्मरणशक्ती कमी व्हायला कारणीभूत ठरतात. म्हणूनच वाढतं वय आणि कमी होत जाणारी स्मरणशक्ती याबाबत पुरेशी माहिती करून घेणं गरजेचं ठरतं.



वयाच्या वीस वर्षांनंतर माणसाच्या मेंदूतल्या पेशी नष्ट व्हायला सुरूवात होते. सुरूवातीला ही प्रक्रिया मंद असते. मेंदूच्या पेशी कार्यरत राहण्यासाठी विशिष्ट रसायनांची गरज असते. ही रसायनं आपल्या शरीरात स्रवत असतात. वयानुरूप त्यांचं प्रमाण कमी होऊ लागतं. वय वाढल्यानंतर माहिती साठवून ठेवण्याच्या मेंदूच्या पद्धतीत बदल होऊ लागतात. यामुळे अनेक गोष्टी आठवताना त्रास होतो. बालपणातल्या किंवा नुकत्याच घडलेल्या काही गोष्टी आठवताना त्रास होत नाही. पण मधल्या काळात घडलेल्या काही घटना पटकन आठवत नाहीत. अलिकडेच भेटलेल्या माणसांची नावं, आदल्या दिवशी घेतलेली न्याहरी, जेवण विस्मरणात जाणं ही याची लक्षणं मानली जातात. वाढत्या वयासोबत इतर काही कारणांमुळे विस्मरण होऊ शकतं. त्यात नैराश्य, शारीरिक आजार, स्मृतीभ्रंश, अमली पदार्थांचं सेवन, डोक्याला दुखापत, स्ट्रोक तसंच अतिरिक्त मद्यपान यांचा समावेश आहे. विस्मरणाचा दैनंदिन आयुष्यावर परिणाम होणं धोकादायक मानलं जातं. छोट्या गोष्टी विस्मरणात जात असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

## वाचा तर खरं

उचकी लागल्यानंतर कोणीतरी आठवण काढत असेल, अशा खुळ्या समजात असाल तर वास्तव समजून घ्या. छाती आणि पोट यांच्यामध्ये एक स्नायूंचा पडदा असतो. या स्नायूला मेंदूचे आदेश पोहोचवण्यासाठी फ्रेनिक नावाची नस असते. या पडद्याला वारंवार उद्दिपन मिळालं अथवा फ्रेनिक नसेमुळे वारंवार उद्दिपन झालं तर उचकी लागते. काही शारीरिक विकारांमुळे उचकी येते तर काही मानसिक रोगही यास कारक ठरत असतात. शरीरात आम्ल आणि अल्कली यांच्या प्रमाणातील बदल उचकीस कारक ठरतो.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## शिवस्नेह फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यात शिवस्नेह फाउंडेशन ही सामाजिक संस्था मागील अनेक वर्षांपासून पाणी, आरोग्य, महिला सक्षमीकरण, शिक्षण या प्रश्नावर काम करीत आहे. कोथळे गावातील महिलांसाठी संस्थेच्या वतीने हळदी कुंकू समारंभ आयोजित केला होता. यावेळी महिला सक्षमीकरण व संविधान जनजागृती अभियान राबविण्यात आले. समाजात महिला- मुली या देखील खूप कार्यक्षम असून समाजात महिलांकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन बदलने गरजेचं आहे. महिलाना संधी मिळाली तर विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा अधिक चांगल्या प्रकारे उमटवू शकतील, असे मत संस्थेचे अध्यक्ष संदिप जगताप यांनी व्यक्त केले. तसेच कोथळे गावच्या सरपंच जयश्री भोईटे यांनी महिलांनी विविध संधीचा फायदा घेणे आवश्यक असून ग्रामपंचायत महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास कटीबद्ध आहे. संस्थेच्या प्रमुख अनिता भोईटे यांनी भारतीय संविधानाची प्रस्ताविका, संविधानाची मूल्ये, नागरिकांची कर्तव्य याविषयी उपस्थितीत महिलांना माहिती दिली. तर रुपाली थोरात यांनी महिला हिंसाचार संदर्भात माहिती दिली. यावेळी महिला राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष वंदना जगताप,ग्रामपंचायत सदस्या नेहा झगडे, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आदी उपस्थिती होत्या. या कार्यक्रमाचे नियोजन संस्थेच्या सचिव हर्षाली जगताप, हर्षदा शिळीमकर, ओंकार भोईटे, राधिका जगताप, प्रवीण काकडे आदींनी केले.

## लोणी येथे भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथील माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी यांनी रविवारी (दि. ९) सकाळी पाच वाजता श्री भैरवनाथ विद्याधाम माध्यविक व उच्च माध्यमिक विद्यालय लोणी या ठिकाणी धावपटूंसाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. सदर स्पर्धेसाठी नाव नोंदणी सुरू असून, स्पर्धकांनी ऑफलाइन किंवा ऑनलाईन नाव नोंदणी करावी, असे आवाहन माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीने केले आहे. ३, ५, १०, २१ किलोमीटर स्पर्धेचे नियोजन केले आहे. ११ ते १८ मुले-मुली गट १८ वर्षा पुढील महिला व पुरुष गट व दिव्यांग गट असे गट आहेत, एक हजार ते पंधरा हजार पर्यंत रोख बक्षीस असून प्रत्येक भाग घेणाऱ्या स्पर्धकास टी-शर्ट, मेडल, चेस्ट नंबर, नाष्टा दिला जाईल. दोन लाख रुपयांची रोख बक्षीसे आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घेऊन आरोग्यासाठी धावा असे आवाहन माजी विद्यार्थी विकास प्रबोधनी व ग्रामस्थ लोणी यांनी केले आहे.

## कर्तृत्व हाच महिलांचा अलंकार



**खेड :** आपला अलंकार आपल्या हातातील कर्तृत्व आहे. जेजे उत्तम आणि उदात्त करता येईल तेते करण्याचे महिलांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांनी केले. राजगुरूनगर येथे स्मार्ट सखी फाउंडेशनच्या वतीने "वाटूया आत्मसन्मानाचे वाण" या उपक्रमांतर्गत एकल विरपत्नी यांचा हळदी कुंकू समारंभ शुक्रवारी (दि. ३१) आयोजित करण्यात आला होता. तहसीलदार ज्योती देवरे यांच्या हस्ते या महिलांना सन्मानित करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या संयोजिका तथा स्मार्ट सखी फाउंडेशनच्या अध्यक्षा आम्रपाली पाटील, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस तालुका महिला कार्यकर्त्या मनिषा सांडभोर, खेड पंचायत समिती विस्तार अधिकारी अनिता ससाणे, मंगल राक्षे यांच्यासह एकल विरपत्नी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## दागिने चोरणाऱ्या कारचालकाला अटक

**कारेगाव :** नजर चुकवून १० तोळ्याचे सोन्याचे गंठण चोरणाऱ्या कारचालकाला रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अटक केली असल्याची माहिती रांजणगाव पोलिसांनी दिली. याप्रकरणी मेटकरीला



शिरुर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला पोलिस कोठडी दिली. नितीन मुरलीधर मेटकरी असे अटक करण्यात आलेल्या कारचालकाचे नाव आहे. याबाबत मानसिंग नानाभाऊ पाचुंदकर, रा.रांजणगाव गणपती, ता.शिरुर यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,मेटकरी हा पाचुंदकर यांच्या वाहनावर चालक असून, पाचुंदकर यांच्या पत्नी ज्योती ह्या काही कामानिमित्त त्यांच्या कारमधून गेल्या असताना, त्यांनी त्यांचे दहा तोळे सोन्याचे गंठण पर्समध्ये ठेवून पर्स कारमध्ये ठेवली. त्यावेळी चालक कारमध्येच होता. काम आटोपून पाचुंदकर ह्या पुन्हा कारमध्ये बसून घरी आल्या असता त्यांनी पर्सची पाहणी केली. त्यावेळी त्या पर्समध्ये दागिने नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

# पटसंख्या कमी असल्याने लागतोय कस

## पोषण आहारात १२ प्रकारच्या पाककृतींचा समावेश : बचत गटांची काटकसर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**वाल्हे :** प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत पोषण आहारात १२ प्रकारच्या पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे. या अशा निर्णयामुळे पूरक असे अनुदान मिळणार नाही. त्यामुळे शाळेतील कमी पटसंख्या असल्यामुळे त्या ठिकाणी बचत गटांना एक प्रकारे काटकसर करावी लागत आहे.

२८ जानेवारीच्या शासन निर्णयानुसार केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत सुधारणा करून, राज्यातील पात्र शाळा मधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पोषण आहारामध्ये विविधता आणण्यासाठी डाळी, व्हेजिटेबल पुलाव, मसालेभात, मटार पुलाव, मुगडाळ खिचडी, चवळी खिचडी, चना पुलाव, सोयाबीन पुलाव, मसूरी पुलाव, मूग शेवगा, वरण-भात, मोड आलेल्या मटकीची उसळ, अंडा पुलाव, गोड खिचडी, नाचणी सत्व, तांदूळ मोड आलेले कडधान्य, खीर अशा प्रकारच्या बारा पाककृतींचा समावेश केला आहे. या बारा प्रकारच्या पाककृती बनवून देण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत.

आठवड्यातील कोणतेही दिवशी पाककृती निश्चित करायची याबाबत निर्णय जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती घेणार आहे. निश्चित केलेल्या पाककृती व्हेजिटेबल पुलाव, मसाले भात, मटर पुलाव, मूगडाळ खिचडी, चवळी खिचडीतून, चना पुलाव, सोयाबीन पुलाव, मसुरी पुलाव, मूग शेवगा, वरण भात, मोड आलेल्या मटकीची उसळ, अंडा पुलाव, गोड खिचडी नाचणी सत्व, शासन निर्णयानुसार एका आठवड्यात सहा व दुसऱ्या आठवड्यात सहा पाककृती ठरवण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आहे. तसेच दोन पर्यायी पूरक पाककृती लोक सहभागातून देण्यासाठीचे आवाहन करावे, असे शासन निर्णयात आहेत. यासाठी सर्वांना आवाहन, करण्यात येत आहे.

### आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही

● विद्यार्थ्यांना पोषण आहार पाककृती बनवून देण्यासाठी अंमलबजावणी होणार आहे. नवीन शासन निर्णयानुसार पर्यायी पूरक आहार पाककृती नाचणी सत्व, गोड खिचडी, लोक सहभागातून उपलब्ध करून घेण्याचे आदेश मिळाले आहेत. तसेच यापुढे पूरक अनुदान मिळणार नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना १२ प्रकारच्या पाककृतीसह दोन पूरक पाककृती देणे महिला बचत गटांना एक प्रकारे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाही.

> पोषक घटकांचा पुलाव आणि गोड खिचडी, नाचणी सत्व या पूरक पाककृतीसाठी आवश्यक पदार्थ व साहित्य लोकसहभागातून घेण्याबाबत सांगितले आहे. याकरिता शासनाकडून अतिरिक्त अनुदान मिळणार नाही. मात्र यासाठी पूर्वीप्रमाणे शासनाकडून निधी उपलब्ध व्हावा.
>
> **- नंदकुमार सागर,** अध्यक्ष पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ.

> पूरक पाककृतीमुळे मुलांचे पोषण मूल्य वाढणार आहे. शाळा, पालक, व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत यांनी लोकसहभाग वाढवला, तर शाळा विकासाला मदत होईल, तसे आव्हान सर्वांना करण्यात येईल. ज्याठिकाणी लोकसहभाग मिळणार नाही. तेथे शासनाला निधीबाबत कळवण्यात येईल.
>
> **-संजय नाईकडे,** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे.

# नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलन

## साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** कुलस्वामिनी साहित्य परिषदेच्या वतीने बुधवारी (दि. १२) रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर (मुंबई) येथे होत असलेल्या खेड तालुक्याचे सुपुत्र, 'पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलना'चे उद्‍घाटन ८९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस हे करणार आहेत. संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक म. भा. चव्हाण, स्वागताध्यक्ष लेखक व सामाजिक कार्यकर्ते अशोक टाव्हरे हे असून निमंत्रक राजु खंडीझोड हे आहेत, अशी माहिती राजगुरूनगर (ता. खेड) येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यAप्रसंगी कनेरसरच्या सरपंच सुनीता केदारी, संयोजक दिलीप माशेरे, कुलस्वामिनी साहित्य परिषदेच्या सुरेखा टाव्हरे, संतोष लोहोकरे, सतिश प्रघणे, विजय कानवडे, दत्तात्रय केदारी, अर्चना प्रघणे, तुकाराम दौंडकर आदी उपस्थित होते. या साहित्य संमेलनास राजकीय, सामाजिक, साहित्य, शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे कुलस्वामिनी साहित्य परिषदेच्या संयोजिका सुरेखा टाव्हरे यांनी सांगितले.

स्वागताध्यक्ष अशोक टाव्हरे म्हणाले की, दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पहिले स्मृती साहित्य संमेलन ढसाळ यांच्या जन्मभूमीत कनेरसर (ता. खेड) येथे पार पडले होते. दुसरे साहित्य संमेलन ढसाळ यांच्या कर्मभूमीत होत आहे. साहित्य संमेलन दुपारी २ ते सायकाळी ६ या कालावधीत संपन्न होणार आहे. यामध्ये ग्रंथदिंडी, निमंत्रितांचे काव्यसंमेलन, परिसंवाद तसेच उद्घाटक व संमेलनाध्यक्ष, मान्यवरांची मनोगते अशी संमेलनाची रूपरेषा आहे.

संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक म. भा. चव्हाण म्हणाले की, साहित्य संमेलन स्थळास भारतीय कामगार चळवळीचे जनक 'रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे साहित्यनगरी' असे नाव देण्यात येणार आहे. या साहित्य संमेलनात लेखक अशोक टाव्हरे यांच्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यावरील "विकासाचा राजमार्ग" या पुस्तकाच्या तिसरी आवृत्तीचे व "हायवे ऑफ डेव्हलपमेंट" या पुस्तकाच्या दुसरी आवृत्तीचे प्रकाशन होणार आहे.

## तरुणाची शस्त्राने वार करून हत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** चिखली पोलीस स्टेशन हद्दीतील वन विभागाच्या जागेत एका ३३ वर्षीय तरुणाची धारदार शस्त्राने वार करून तसेच दगडाने ठेचून खून केल्याची घटना घडली होती. याबाबत कोणताही ठोस पुरावा नसताना पिंपरी चिंचवड शहर पोलिसांनी संशयित तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. यातील आरोपींवर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात देखील गंभीर गुन्हे दाखल असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांकडून संशयितांची कसून चौकशी सुरु आहे.

भैय्या गमन राठोड (वय ३३) या तरुणाचा खून झाल्याची घटना घडली होती. आरोपींनी भैय्या राठोड याच्यावर धारदार शस्त्राने वार करून तसेच त्याच्या तोंडावर दगड घालून त्याचा खून केल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे.

या प्रकरणी सुरज हनुमंत इंगळे, मेहुल कैलास गायकवाड आणि अजय अशोक कांबळे या तीन आरोपींनी मिळून भैय्या गमन राठोड या तरुणाचं खून केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. राठोड याचा खून करणारे आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. तसेच त्यांच्यावर यापूर्वी सुद्धा महाळुंगे एमआयडीसी, पिंपरी व चिखली पोलीस ठाण्यात वेगवेगळे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

## खेड महसूल प्रशासनातर्फे शहरातून जनजागृती फेरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** शेतकऱ्यांसाठी महत्वकांक्षी असलेल्या ऍग्रीस्टॅक फार्मर आयडी काढण्यासाठी खेड महसूल प्रशासनाकडून राजगुरूनगर शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

पुणे नाशिक महामार्गावरील हुतात्मा राजगुरू स्मृतीशिल्प ते वाडा रोडवरील उपविभागीय अधिकारी कार्यालय अशी "फार्मर आयडी जनजागृती रॅली" काढण्यात आली. रॅलीत डिजे, ढोलपथक, पारंपरिक श्रृंगार केलेले विद्यार्थी - शेतकरी, घोषवाक्य फलक आदी आकर्षण ठरले. रॅलीची सुरुवात हुतात्मा राजगुरू, भगतसिंग सुखदेव, डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास तहसीलदार ज्योती देवरे यांचे हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करून झाली.

याप्रसंगी निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड, प्रांत नायब तहसीलदार रविंद्र मोरे, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, पुरवठा निरीक्षण अधिकारी महादेव कुंभार, हुतात्मा राजगुरू विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक नगरकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय शेटे व कोंडीभाऊ पाचारणे, द. मा. पिंगळे, संकेत तनपुरे, नितीन कदम, यांच्यासह कृषी, शिक्षण, परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## ऍग्रीस्टॅक फार्मर आयडी...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



राजगुरूनगर ऍग्रीस्टॅक फार्मर आयडी काढण्यासाठी खेड महसूल प्रशासनाकडून राजगुरूनगर शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

# पीकविमा योजना भ्रष्टाचार, दोषींवर कठोर कारवाई करणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरलेल्या पीकविमा योजनेतील भ्रष्टाचार प्रकरणाबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत प्रश्न विचारला असता, त्याला उत्तर देत याबाबत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय कृषिमंत्र्यानी लोकसभेत दिले.

लोकसभेत आज झालेल्या प्रश्नोत्तराच्या चर्चेदरम्यान खासदार सुळे यांनी हा प्रश्न विचारला. खुद्द महाराष्ट्राच्या कृषीमंत्र्यांनी पीक विमा योजनेत ५०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची कबुली दिली आहे. इतकेच नाही, तर सत्ताधारी असलेल्या भाजपचे आमदार सुरेश धस यांनी तो घोटाळा तब्बल ५ हजार कोटींचा असल्याचा दावा केला आहे.

हा प्रकार अत्यंत गंभीर असून राज्यातील हजारो लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशाचा अपहार झाल्याची कबुली खुद्द सरकारनेच दिली आहे.

राज्य शासनाच्या या कबुलीबाबत केंद्रीय कृषीमंत्री म्हणून आपणास याबद्दल माहित होते का? आणि या घोटाळ्याचे चौकशीचे आदेश आपण देणार का? असा प्रश्न सुळे उपस्थित केला. यावर लागलीच उत्तर देत कृषीमंत्र्यांनी या प्रकरणाची चौकशी करुन कोणीही दोषी आढळल्यास कठोर कारवाई करु, असे आश्वासन दिले.

# अवांतर वाचनाची गोडी जोपासावी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**अवसरी :** शालेय विद्यार्थ्यांना सुरूवातीपासूनच अवांतर वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी शालेय वेळापत्रकातील आठवड्यातील एक तास वाचनासाठी राखून ठेवला पाहिजे, असे मत सनदी अधिकारी व महाराष्ट्र शासनाच्या 'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी ' (यशदा) चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी, चांडोली बुद्रुक (ता.आंबेगांव) येथे व्यक्त केले. येथील श्री कान्होबा सार्वजनिक वाचनालयाने ( शासनमान्य (अ दर्जा ) दरवर्षी प्रमाणे आयोजित केलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उद्योजक, ऊर्जा फूडस व ऍग्रो प्रा. लिमी.चे संस्थापक संचालक प्रमोद हिंगे पाटील हे होते. वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष ग्रंथमित्र प्रा. लक्ष्मण थोरात यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विविध क्षेत्रातील आदर्शवत व प्रेरणादायी काम करणाऱ्या व्यक्तींना, वाचनालयाचे संस्थापक संचालक कै. गुलाब बापूराव थोरात स्मृती समाजरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले.

यात आंतरराष्ट्रीय धावपटू व ज्येष्ठ नागरिक हरिश्चंद्र थोरात, आय.आर. बी. चे जनरल मॅनेजर व सामाजिक कार्यकर्ते रविंद्र वायाळ, अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला पुणे ग्रामीण चे अध्यक्ष बाळासाहेब कानडे, यांचा समावेश होता. तर उद्योजक * प्रमोद हिंगे पाटील* यांना 'कमलराज उद्योगसमूह पुरस्कृत उद्योगरत्न पुरस्काराने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थी ,गुणवंत शिक्षक, आदर्श वाचक, साहित्यिक इ.चा ही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त कृषी उपसंचालक किशोर डेरे, उद्योजक व वाचनालयाचे उपाध्यक्ष मोहन थोरात, सेवानिवृत्त राज्यकर अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर थोरात, उद्योजक अजय घुले, सचिव प्रा. प्रभाकर मावकर, वाचनालयाचे संचालक, शिक्षक, ग्रामस्थ, निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आवक घटल्याने आणि सध्या हंगाम नसल्याने

# तेलबिया, कापसांचे लिलाव आता मंगळवारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दर मंगळवार, शुक्रवारी तेलबियांचे व बुधवारी आणि शनिवारी कापसाचे लिलाव घेतले जात होते. परंतु, सध्या आवक घटल्याने आणि सध्या हंगाम नसल्याने बारामती मर्चंट असोसिएशनच्या मागणीनुसार तेलबिया व कापसाचे उघड लिलाव फक्त दर मंगळवारीच होणार असल्याची माहिती समितीकडून देण्यात आली.

बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य बाजार आवारात दर मंगळवार व शुक्रवार या दिवशी तेलबियांचे लिलाव उघड पद्धतीने होतात. तसेच कापुसाचे लिलाव दर बुधवार आणि शनिवार या दिवशी उघड पद्धतीनेच घेतले जातात.

बारामती मर्चन्ट असोसिएशन यांनी केलेल्या मागणीनुसार व सध्या हंगाम नसल्याने तेलबिया व कापुसाची आवक कमी असल्याने ४ तारखेपासून तेलबिया व कापसाचे लिलाव आठवड्यातुन दर मंगळवार या दिवशी ठरलेल्या वेळेत घेतले जातील. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतमाल त्याच दिवशी बाजार आवारात विक्रीस आणावा आणि विक्रीस आणताना स्वच्छ व ग्रेडींग करून आणावा, असे आवाहन समितीचे सभापती विश्वास आटोळे व उपसभापती रामचंद्र खलाटे यांनी केले आहे.

बाजार आवारात सोयाबीन, सुर्यफुल, भुईमूगशेंग या शेतमालाची आवक साधारण असुन चालु आठवड्यात सोयाबीनला किमान रू. ३८५० तर कमाल रू. ४०५१ प्रति क्विंटल दर मिळाला आणि सुर्यफुल कमाल दर रू. ६६५१ व भुईमूगशेंग चे कमाल रू. ४८०० प्रति क्विंटल दर निघाले तर कापसाला कमाल रू. ६५०० आणि सरासरी रू. ६४०० असे दर निघाले. सध्या सोयाबीन खरेदी केंद्र सुरू असून, ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे, अशा शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणेची मुदतवाढ दि. ६ फेब्रुवारी २०२५ पर्यन्त देणेत आली आहे. बारामती बाजार समितीमध्ये शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाले पासुन आतापर्यन्त ३५० शेतक-यांची ०२८ क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली आहे, अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली.




# मधुमेहाची प्राथमिक लक्षणे



व्याधी विचार

भारतात मधुमेहींची संख्या झपाट्याने वाढत आहे. टाईप २ मधुमेह तरुणांपासून ज्येष्ठांना आपल्या विळख्यात घेत आहे. या व्याधीचं वेळेत निदान झालं तर पुढील गुंतागुंत टाळता येऊ शकते. टाईप २ मधुमेह हा सर्वसाधारणपणे आढळणारा प्रकार. यात शरीर इन्शुलिन या घटकाला प्रतिकार करू लागतं किंवा शरीरात इन्शुलिनची निर्मितीच होत नाही. इन्शुलिन हे शरीरातलं अत्यंत महत्त्वाचं हार्मोन असून त्याची निर्मिती स्वादुपिंडात होते. शरीराच्या चयापचय क्रियेच्या संतुलनात इन्शुलिन महत्त्वाची भूमिका बजावतं. यासोबतच रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्याचं कामही इन्शुलिन करतं. टाईप २ मधुमेहाची काही लक्षणं दिसून येतात. ही प्राथमिक लक्षणं वेळीच ओळखली तर मधुमेह नियंत्रणात राहू शकतो. कोणती आहेत की लक्षणं? जाणून घेऊ या.

- मधुमेह जडल्यानंतर रक्तातली साखरेची पातळी वाढते. रक्तातली ही अतिरिक्त साखर काढून टाकण्याचा मूत्रपिंडांचा प्रयत्न असतो. ही साखर मूत्रावाटे बाहेर पडत असल्याने तुम्हाला वारंवार लघुशंकेला जावं लागतं. त्यातही रात्रीच्या वेळी हे प्रमाण वाढतं. हे टाईप २ मधुमेहाचं सुरुवातीचं लक्षण मानलं जातं.
- मूत्रावाटे पाणी बाहेर पडल्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. मूत्रपिंडांद्वारे शरीरातली अतिरिक्त साखर बाहेर पडल्यामुळे डिहायड्रेशनची समस्या जाणवते. यामुळे सतत तहान लागते. नेहमीपेक्षा अधिक तहान लागत असेल तर रक्ताची तपासणी करून घ्या.
- टाईप २ मधुमेहाचा शारीरिक ऊर्जेवर विपरित परिणाम होतो. पेशींना पुरेशा प्रमाणात ऊर्जा मिळत नसल्याने वारंवार थकवा जाणवतो. सतत दमल्यासारखं वाटत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- रक्तातली अतिरिक्त साखर डोळ्यांमधल्या अत्यंत छोट्या रक्तवाहिन्यांवर परिणाम करते. त्यामुळे अंधुक दिसू लागतं. अचानक अंधुक दिसू लागणं हे मधुमेहाचं लक्षण असू शकतं.
- मधुमेहाचा रक्ताभिसरणावर परिणाम होतो. यामुळे छोट्या जखमा बऱ्या व्हायला काही आठवडे किंवा महिने लागू शकतात. जखम लवकर बरी होत

# बाल्यावस्थेतील मासिक पाळी ही चिंताजनक समस्या

**तारुण्य, ज्याला पौगंडावस्था देखील म्हणतात, हा एक काळ असतो जेव्हा मुलांच्या शरीरात लैंगिक विकासाची प्रक्रिया सुरू होते. ही प्रक्रिया आठ ते १३ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये आणि नऊ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये आढळते. या काळात शारीरिक आणि मानसिक बदल होतात जसे की स्तनांचा विकास, चेहऱ्यावरील आणि जननेंद्रियाच्या केसांची वाढ आणि मुलींमध्ये मासिक पाळी सुरू होणे. तथापि, आता भारतीय समाजात एक नवीन आणि चिंताजनक समस्या उद्भवत आहे आणि ती म्हणजे लवकर यौवन किंवा अकाली यौवन म्हणजेच सहा वर्षांच्या मुलींमध्ये मासिक पाळी सुरू होणे.**



लवकर तारुण्य ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. त्यामुळे केवळ मुलांच्या आरोग्यालाच धोका नाही, तर त्याचे मानसिक, सामाजिक आणि भावनिक परिणामही खूप खोलवर होऊ शकतात. अशा परिस्थितीत ही समस्या का वाढत आहे, त्याची कारणे काय आहेत आणि ती थांबवण्यासाठी कोणती पावले उचलली जाऊ शकतात हे जाणून घेतले पाहिजे.

### तारुण्यकाळात शरीरात बदल घडतात

शरीराच्या अवयवांची वाढ, हार्मोनल बदल आणि लैंगिक वाढ. जेव्हा ही प्रक्रिया सामान्य वेळेपूर्वी सुरू होते, तेव्हा त्याला लवकर यौवन किंवा प्रिकोशियस प्युबर्टी म्हणतात.

साधारणपणे, मुलींमध्ये तारुण्य आठ ते १३ वर्षांच्या दरम्यान सुरू होते; परंतु काही प्रकरणांमध्ये ती वर्षांच्या वयातदेखील सुरू होऊ शकते. भारतात लवकर यौवनाची समस्या गेल्या काही वर्षांमध्ये वाढली आहे आणि आता ही मुले आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठी चिंतेची बाब बनली आहे. गेल्या काही वर्षांत मुलींमध्ये संक्रमणाचा कालावधी कमी झाला आहे. मुलींमध्ये शारीरिक बदलांची लक्षणे दिसल्यानंतर १८ महिने ते तीन वर्षांनंतर मासिक पाळी सुरू होते; पण आता शारीरिक बदलांची लक्षणे दिसू लागल्यावर त्यांची मासिक पाळी तीन ते चार महिन्यांमध्ये सुरू होते.

### लवकर वयात येण्यामागची कारणे

लवकर वयात येण्यामागे अनेक गुंतागुंतीची कारणे असू शकतात. या कारणांमध्ये जैविक, पर्यावरणीय, सामाजिक आणि शहरीकरणाशी संबंधित घटकांचा समावेश होतो.

### कीटकनाशके आणि रासायनिक प्रदूषण

कीटकनाशके आणि रासायनिक प्रदूषणामुळे मुलांच्या हार्मोनल प्रणालीवर परिणाम होऊ शकतो. वास्तविक, कीटकनाशकांमध्ये अशी रसायने असतात, जी शरीराच्या संप्रेरक प्रणालीमध्ये गोंधळ घालू शकतात. हार्मोनल असंतुलन उद्भवते आणि तारुण्य लवकर सुरू होऊ शकते.

### पोषण आणि आहार

पोषणाचा परिणाम मुलांच्या विकासावर खोलवर होतो. अलीकडच्या काळात मुलींमध्ये यौवनाचा काळ कमी झाला आहे. हे मुलांमधील वाढत्या वजन आणि लठ्ठपणाशी संबंधित असू शकते. जास्त चरबीयुक्त पदार्थ आणि उच्च-कॅलरी खाण्याच्या सवयींमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. त्यामुळे हार्मोनल बदल होऊ शकतात. पॅकेज्ड फूड,

लक्षात घेऊ

प्रक्रिया केलेले पदार्थ, प्रिझर्व्हेटिव्ह्ज यांचा अतिवापर केल्यानेही शरीराच्या वाढीला गती येते. या रसायने आणि सिंथेटिक्समुळे हार्मोनल असंतुलन होऊ शकते. त्यामुळे तारुण्य सामान्यपेक्षा लवकर सुरू होते.

### लठ्ठपणा

लठ्ठपणा, जी जागतिक आरोग्य समस्या बनली आहे, हे अकाली यौवनाचे मुख्य कारण आहे. लठ्ठपणा हा मुलांमध्ये लवकर यौवन होण्याचा सर्वात मोठा धोका घटक बनला आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात ही समस्या वाढली आहे. जेव्हा मुले घरी जास्त वेळ घालवू लागली आणि शारीरिक हालचाली कमी झाल्या. लठ्ठपणामुळे, शरीरात अतिरिक्त चरबी जमा होते. त्यामुळे इस्ट्रोजेनसारख्या हार्मोन्सचे उत्पादन वाढते. परिणामी, मुलींना मासिक पाळी लवकर सुरू होऊ शकते, जी सहसा १० ते १३ वर्षांच्या दरम्यान होते.

### स्क्रीन टाइम आणि डिजिटल मीडिया

आजकाल मुले मोबाईल, टीव्ही आणि इतर डिजिटल उपकरणांवर जास्त वेळ घालवल्यामुळे ही समस्या वाढत आहे. मुलांमधील मानसिक आणि शारीरिक बदल जास्त स्क्रीन टाइम आणि डिजिटल मीडियाद्वारे वेगवान होऊ शकतात. ऑनलाइन गेम्स, सोशल मीडिया आणि इतर प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक सामग्रीचा मुलांच्या मानसिक विकासावर परिणाम होतो आणि परिणामी त्यांच्या शारीरिक विकासालाही गती मिळू शकते. यामुळे मानसिक आणि हार्मोनल असंतुलन होऊ शकते, त्यामुळे यौवनाची चिन्हे लवकर दिसू शकतात.

### कुटुंब आणि समाजाचा प्रभाव

भारतात मुलांच्या मानसिक स्थितीवर कुटुंब आणि समाजाचा मोठा प्रभाव असतो. कौटुंबिक तणाव, मानसिक दबाव आणि अनिश्चितता यांचा परिणाम मुलांच्या हार्मोनल विकासावर होतो. जेव्हा मुलांना कौटुंबिक समस्या किंवा सामाजिक ताणतणावांचा सामना करावा लागतो, तेव्हा त्यांच्या शरीरात हार्मोनल असंतुलन होऊ शकते. त्यामुळे लवकर यौवन होऊ शकते. याशिवाय, मुलांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीवर त्यांच्या आजूबाजूच्या लोकांचाही परिणाम होतो. कुटुंबात जास्त वजन किंवा शारीरिक विकृती असल्यास मुलांनाही अशाच समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

# असोपेसियामुळे केस गळतात?

**चेहरा, त्वचेप्रमाणे केस हे सौंदर्याचे प्रतीक मानले जाते. केसांमुळे व्यक्तीचे सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व खुलून दिसते. तुमचे केस वेगाने आणि अतिप्रमाणात गळत असतील तर उपचार करायला हवेत.**



आरोग्यवेध

'लोपेसिया अरेटा' हा केसगळतीचा सर्वात सामान्य विकार आहे. अलोपेसिया म्हणजे टक्कल पडणे आणि अरेटा म्हणजे केस गळणे आणि हा आजार सामान्यतः सर्व वयोगटातील पुरुष आणि स्त्रियांमध्ये दिसून येतो. 'लोपेसिया अरेटा'मुळे टाळूवर आणि शरीराच्या इतर भागांवर केस लहान गोलाकार पॅचमध्ये गळतात. 'लोपेसिया अरेटा'एक 'ऑटोइम्यून'आजार आहे. यात शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती आणि पांढऱ्या रक्ताच्या पेशी, ज्यांचे काम आजारांशी लढण्याचे असते. अशा पेशी 'हेयर फॉलिक्स'वर हल्ला करतात. त्यामुळे केस वेगाने गळायला सुरुवात होते. केस गळणे जसजसे वाढत जाते तसतसे पॅच एकमेकांना जोडतात आणि संपुर्ण टाळूवर टक्कल पडू लागते. हे केस सामान्यतः काही महिन्यांत पुन्हा वाढतात; परंतु उपचार न केल्यास अशा प्रकारचे केस पुन्हा गळतात. केसांची वाढ आणि केस गळतीचे चक्र हे वर्षानुवर्षे टिकू शकते.

'लोपेसिया अरेटा'ही वेदनादायक स्थिती नाही; परंतु एखाद्या व्यक्तीच्या जीवनावर आणि आत्मविश्वासावर परिणाम करते. त्यामुळे नैराश्य, चिंता आणि इतर भावनिक समस्या उद्भवतात. 'लोपेसिया अरेटा' वर कायमस्वरूपी इलाज नाही; पण तज्ज्ञांच्या सल्ल्याने त्याचे योग्य व्यवस्थापन करू शकतो. भविष्यात केस गळण्याची समस्या टाळू शकता. ही परिस्थिती तेव्हा उद्भवते, जेव्हा 'इम्यून सिस्टीम' चुकून 'हेयर फॉसिल्स'ना लक्ष्य करते. त्यामुळे केस गळतात. यामध्ये रोगप्रतिकारक प्रणाली केसांच्या मूळांवर हल्ला करते आणि त्यामुळे केस गळू लागतात आणि पातळ होतात.

'लोपेसिया अरेटा'कशामुळे?

▪ कौटुंबिक इतिहास ▪ मधुमेह ▪ संधिवात ▪ व्हायरल इन्फेक्शन ▪ हार्मोनल बदल ▪ आघात ▪ भावनिक किंवा शारीरिक ताण

**'लोपेसिया अरेटा'ची लक्षणे**

टाळूवर पॅचेस पडणे. पापण्या, भुवया, दाढी, हात, पाय आणि शरीराच्या इतर भागांवरीलही केस गळतात. काही लोकांमध्ये, लक्षणे दिसण्यास विलंब होतो; परंतु काही प्रकरणांमध्ये, ते जलद आणि अपरिवर्तनीय असू शकतात. केस गळल्यानंतर सहसा पुन्हा वाढतात; परंतु पुन्हा वाढलेले केस हे एकसारखे नसतात आणि ते हलक्या रंगाचे असतात. असे देखील होऊ शकते की, जेव्हा एक पॅच पुन्हा वाढतो तेव्हा दुसरा पॅच तयार होऊ शकतो.

केस गळतीचे उपचार वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतात. जसे की सुरुवातीचे वय, केस गळण्याचे प्रमाण, नखांमधील बदल आणि इतर वैद्यकीय परिस्थिती. एक साधी 'ट्रायकोस्कोपी' आणि त्वचेची बायोप्सीदेखील तज्ज्ञांना केस गळण्याचे प्रकार आणि कारण अधिक चांगल्या प्रकारे निर्धारित करण्यात मदत करतात.

लोपेसिया अरेटाचे अनेक प्रकार आहेत. ते केस गळण्याच्या प्रमाणात वैशिष्ट्यीकृत आहेत आणि प्रत्येक प्रकारच्या केस गळतीचे उपचारदेखील भिन्न आहेत. *'लोपॅसिया रेटा' हा सर्वात सामान्य प्रकारचा अलोपेसिया आहे. ज्यात केस नाण्यांच्या आकाराच्या पॅचमध्ये पडतात.

▪ **टोटालिस** : या प्रकारात तुमच्या डोक्यावरील केस पूर्णच गळतात.

युनिव्हर्सलिसः हा एक दुर्मिळ प्रकार आहे. यात डोके, चेहरा आणि शरीराच्या इतर भागातले केस पूर्णपणे गळतात.

▪ डिफ्यूज अलोपेसिया एरियाटाः हे केस गळतीसारखेच दिसते, सामान्यतः कोणतेही पॅच नसतात आणि संपूर्ण टाळूवर केस पातळ होतात. ▪ ओफियासिस अलोपेशियाः केस गळणे हे टाळूच्या मागील आणि खालच्या बाजूने होते.

भारतात केस पुन्हा वाढवण्याचे उपचार तुमचे वय, केस गळण्याचे ठिकाण आणि तुमचे केस गळण्याचे प्रमाण यावर अवलंबून असेल. जर 'लोपेसिया अरेटा' एक वर्षापेक्षा कमी कालावधीचा असेल तर तुमचे केस जास्त उपचार न करता वाढू शकतात.

**उपचार पर्याय:**

**मिनोक्सिडिलः** केसांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी ओव्हर-द-काउंटर मिनोऑक्सिडिल स्काल्पवर लावले जाऊ शकते.

**अँथ्रॅलिन** : हे औषध प्रभावित भागात लागू केले जाते आणि केस गळतीस कारणीभूत असलेल्या रोगप्रतिकारक प्रतिसादात बदल करतात असे मानले जाते.

**कॉर्टिकोस्टिरॉईडस** : टॉपिकल किंवा इंजेक्टेड कॉर्टिकोस्टिरॉईड्स प्रभावित भागात जळजळ कमी करू शकतात आणि केसांच्या वाढीस उत्तेजन देऊ शकतात.

# मोबाईलवर तास न तास घालवताय, 'ब्रेन रॉट'ची शिकार व्हाल!

**मोबाईल फोन ही काळाची गरज आहे. या फोनवरून एका वेळी अनेक कामे शक्य झाली आहेत. इंटरनेट स्वस्तात उपलब्ध झाल्याने अनेक लोक सोशल मीडियावर तासन्तास घालवतात; पण फोन जास्त पाहणे आरोग्य आणि मानसिक संतुलनासाठी हानिकारक आहे. एका नवीन संशोधनात धक्कादायक गौप्यस्फोट करण्यात आला असून, फोन स्क्रीनमधून निघणाऱ्या हानिकारक किरणांचा आपल्या मेंदूवर वाईट परिणाम होतो. जास्त वेळ रील किंवा व्हिडीओ पाहण्याच्या सवयीमुळे शारीरिक नुकसान तर होतेच; पण मानसिक संतुलन बिघडण्यासही मदत होते.**



संशोधन

'ब्रेन रॉट' या वैद्यकीय शब्दाची गेल्या काही दिवसांपासून आरोग्य विभागात चर्चा सुरू आहे. हे मेंदू आणि इंटरनेट तसेच फोनशी संबंधित आहे. याचा अर्थ असा आहे, की स्क्रीनचा दीर्घकाळ वापर केल्याने मेंदूवर नकारात्मक परिणाम होतो. 'ब्रेन रॉट' ही एक मानसिक स्थिती आहे, जिच्यात स्क्रीनशी जास्त वेळ जोडलेले राहिल्याने मेंदूवर नकारात्मक परिणाम होतो. यामुळे मानसिक थकवा, लक्ष न लागणे, स्मरणशक्ती कमी होणे आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. स्क्रीनवर जास्त वेळ घालवल्याने मेंदूचे कार्य मंदावते. त्यामुळे मानसिक क्षमता कमी होते.

**'ब्रेन रॉट'ची प्रमुख कारणेः**

■ फोनवर बराच वेळ राहणे ■ डिजिटल ओव्हरलोड म्हणजे सोशल मीडियावर जास्त वेळ घालवणे. ■ तुम्ही एकाच वेळी अनेक कामे करत असाल तर त्याचा मेंदूवरही परिणाम होतो, परिणामी मेंदूची फोकस पॉवर कमकुवत होते.

**'ब्रेन रॉट'ची लक्षणेः**

■ 'कॉग्निटिव एबिलिटी'- म्हणजे आपण लक्ष केंद्रित करणे किंवा सर्जनशीलता यासारखी मानसिक कार्ये करण्यास अक्षम आहात. ■ 'इमोशनल वीकनेस'- फोन स्क्रीनच्या जास्त संपर्कामुळे नैराश्य, एकटेपणा आणि चिंता या भावना येऊ शकतात. ■ 'प्रोफेशनल वर्क परफॉर्मन्स'- जे लोक फोनचा जास्त वापर करतात, त्यांची कामातील रुची कमी होते. कामातील निष्काळजीपणामुळे आपण आपले मन फोनमध्ये अधिक व्यस्त करतो.

**हे कसे रोखणार?**

■ फोन मर्यादित वापरा. ■ फोन व्यतिरिक्त, इतर क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करा. ■ मल्टीटास्किंग टाळा. ■ चांगल्या आणि सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करा.

# बहुगुणी आक्रोड



आजीबाईंचा बटवा

आक्रोड हा पोषणमूल्यांनी परिपूर्ण असा सुक्या मेव्यातला घटक आहे. यात प्रथिनं, आरोग्यदायी फॅट्स, खनिजं आणि जीवनसत्त्वं मुबलक प्रमाणात असतात. इतर सुक्या मेव्याच्या तुलनेत आक्रोडमध्ये अँटीऑक्सिडंट्सचं प्रमाण बरंच जास्त असतं. यातल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिड्समुळे हृदयाचं आरोग्य चांगलं रहातं. आक्रोडात पॉलिफेनॉल हा घटक असतो. या घटकामुळे दाह कमी व्हायला मदत होते. यातल्या आरोग्यदायी फॅट्स, मॅग्नेशियम आणि फायबरमुळे रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो, रक्ताभिसरणही सुधारतं. आक्रोडातल्या पोषक घटकांमुळे उतारवयातही शरीराची शक्ती टिकून रहाते आणि आपण कार्यक्षम राहू शकतो.

# टूथब्रशही स्वच्छ हवा


दंतारोग्य

टूथब्रश पटकन हाती लागण्यासाठी आपण तो बेसिनजवळ किंवा बाथरूममध्ये ठेवतो. स्वच्छतेबाबत दक्ष असणारे काही जण ब्रश बेसिनवरच्या किंवा बाथरूममधल्या छोट्या कपाटात ठेवतात. दातांची काळजी घेत असताना टूथब्रशच्या स्वच्छतेचा आपण किती विचार करतो? वातावरणातले असंख्य जंतू या टूथब्रशवर बसत असतात. कपाटातलं कुंद वातावरण बॅक्टेरियांच्या



वाढीला आमंत्रण देतं. त्यामुळे शक्यतो ब्रश मोकळ्या हवेत ठेवायला हवा. मधल्या काळात तो वाळायला हवा. म्हणूनच तो बंदिस्त कपाटात ठेऊ नये.

# भारतात दर तासाला सर्पदंशाने सहा मृत्यू



काळजी घ्या

भारतात दरवर्षी सरासरी ५८ हजार लोक साप चावल्यामुळे आपला जीव गमावतात. हा आकडा नक्कीच चिंताजनक आहे. जगभरातील मृत्यूंच्या आकडेवारीवर नजर टाकली, तर ऐंशी हजार ते एक लाख तीस हजार जण साप चावल्यामुळे मरण पावतात. त्यात भारताचा वाटा सर्वाधिक आहे. यामुळेच भारताला 'स्नेक बाईट कॅपिटल ऑफ वर्ल्ड' म्हटले जाते.

'इंडियन मिलियन डेड स्टडी २०२०' नुसार, भारतात दर तासाला सुमारे ६ लोक साप चावल्यामुळे आपला जीव गमावतात. सर्पदंशाच्या घटनांबद्दल बोलायचे झाल्यास दरवर्षी ३० ते ४० लाख प्रकरणे नोंदवली जातात. सर्पदंशाच्या या वाढत्या घटना पाहता सरकारने सर्पदंशाचा समावेश 'नोटिफायेबल' आजाराच्या श्रेणीत केला आहे. ज्या रोगांमध्ये संसर्ग पसरण्याची उच्च शक्यता असते, ज्यांच्या परिणामी मृत्यू होतो किंवा योग्य उपचार शोधण्यासाठी लवकरात लवकर चाचणी करणे आवश्यक असते, अशा सर्व रोगांना सूचित करण्यायोग्य रोगांच्या यादीत समाविष्ट केले जाते.

बहुतेक राज्ये क्षयरोग, एचआयव्ही, कॉलरा, मलेरिया, डेंग्यू आणि हिपॅटायटीस यासारख्या संसर्गाकडे लक्ष देण्यास योग्य मानतात. साप चावताच त्याचा स्राव रक्तात मिसळू लागतो आणि संपूर्ण शरीरात पसरतो. हे आपल्या सर्वांना माहीत आहे. या काळात, नसा खराब होऊ लागतात. त्यामुळे हृदय आणि फुफ्फुसांना अर्धांगवायू होऊ शकतात. सर्पदंशावर वेळीच उपचार न केल्यास रुग्णाचा मृत्यूही होऊ शकतो. अशा परिस्थितीत सर्पदंशामुळे होणारा मृत्यू टाळण्यासाठी किंवा गंभीर शारीरिक समस्या उद्भवू नयेत, यासाठी रुग्णाला अँटीव्हेनम देण्याची गरज आहे.

# पलंगावर बसून खाऊ नका

अनेकांच्या बेडरूममध्ये टिव्ही नसला तरी हातात स्मार्टफोन असतो. काहींना पलंगावर बसून खाण्याची सवय असते. ही सर्वसाधारण बाब वाटत असली तरी झोपण्याच्या पलंगावर बसून खाण्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. पलंगावर बसून खाल्ल्यामुळे आपल्या झोपेवर परिणाम होतो. पलंगावर बसून खाणं, टिव्ही बघणं यासारख्या कृतींमुळे मेंदूला वेगळाच संदेश मिळतो. पलंग ही शांत झोपेची जागा नाही, असा त्याचा समज होतो आणि तुम्हाला शांत झोप लागत नाही. पलंगावर पडलेल्या अन्नकणांमुळे बॅक्टेरियांची संख्या झपाट्याने वाढू लागते. यामुळे तुमचा पलंग रोगांचं आगार बनून जातो. हे टाळण्यासाठी चादरी, उशांचे अभ्रे नियमितपणे बदलणं गरजेचं आहे. पलंगावर बसून स्मार्टफोनवर चित्रपट बघत खाल्ल्याने आपलं लक्ष विचलित होतं. खाताना सगळं लक्ष त्या एकाच कृतीकडे असायला हवं. लक्ष विचलित झाल्यामुळे अतिखाणं होतं. खाण्यावर आपलं नियंत्रणच रहात नाही. परिणामी, वजन वाढू लागतं. त्यामुळे डायनिंग टेबल किंवा जमिनीवर बसून खायला हवं.

आपण कुठे चुकतो?




# इरिटेबल मेल सिंड्रोमविषयी...

आरोग्य चर्चा

महिलांच्या शरीरात मासिक पाळीदरम्यान बरेच बदल होतात. त्यांच्या वागणुकीत चढउतार जाणवतात. कधी पटकन राग येतो, कधी रडू येतं, कधी भावनांना आवर घालणं कठीण होतं. अंगदुखी, पोटदुखी अशा शारीरिक समस्याही जाणवतात. याला 'प्रीमेन्स्ट्रूअल सिंड्रोम' (पीएमएस) असं म्हटलं जातं. मासिक पाळीच्या एक किंवा दोन आठवडे आधी अशी लक्षणं दिसून येतात. पुरुषांमध्ये मासिक पाळीसारखा कोणताही प्रकार नसला तरी महिन्यातले काही दिवस त्यांच्या वागणुकीत बदल झाल्याचं जाणवतं. 'प्रीमेन्स्ट्रूअल सिंड्रोम'सारखी काही लक्षणं पुरुषांमध्येही आढळतात. याला 'इरिटेबल मेल सिंड्रोम' (आयएमएस) असं म्हणतात. हार्मोन्समधल्या बदलांमुळे असं होतं. 'इरिटेबल मेल सिंड्रोम' हा शब्द फिजिओथेरेपिस्ट जेड डायमंड यांनी प्रचलित केला.

आयएमएस म्हणजे पुरुषांमध्ये आढळणारी अतिसंवेदनशीलता, नैराश्य, भीती, अस्वस्थता आणि राग यांसारखी लक्षणं. शरीरात होणारे जैवरासायनिक बदल, हार्मोन्सचं असंतुलन, ताण या बाबी याला कारणीभूत ठरतात. म्हणूनच महिन्यातले काही दिवस पुरुष चिडचिड करतात. कधी त्यांना निराश आणि हताश वाटतं. कधी ते चांगले असतात तर कधी पटकन रागवतात. पुरुषांच्या वागणुकीतल्या बदलांना अनेक घटक कारणीभूत ठरतात. मात्र टेस्टोस्टेरॉन हार्मोन्समधले बदल, चढउतार याला प्रामुख्याने कारणीभूत ठरतात. यासोबतच ताणाच्या पातळीत झालेले बदलही आयएमएसला कारणीभूत ठरू शकतात.

आहारातल्या सूक्ष्म बदलांमुळेही पुरुषांच्या वागणुकीत बदल होतात. जैवरासायनिक बदलही या व्याधीला जबाबदार ठरतात. पुरुषांचं वय वाढू लागल्यावर त्यांच्या शरीरातल्या टेस्टोस्टेरॉनच्या पातळीत घट होत जाते. यामुळेही त्यांच्या वर्तनात अमूलाग्र बदल होतात. पुरुषांच्या शरीरातल्या हार्मोनल बदलांचा कधीच विचार केला जात नाही. त्यामुळे पुरुषांच्या वागणुकीतल्या बदलांमागचं नेमकं कारण जाणून घेण्याचा प्रयत्नच होत नाही. पुरूषांचं चिडणं, हळवं होणं हे एखाद्या विकाराचं लक्षण असू शकतं, हे कोणाच्या लक्षातही येत नाही. यामुळे वर्षानुवर्षं हा प्रकार असाच सुरू रहातो. मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या शारीरिक बदलांचा पुरूषांनी सहानुभूतीने विचार करावा, असं महिलांना वाटत असतं. त्याचप्रमाणे आपल्या नात्यातल्या पुरूषांमध्ये असे काही बदल जाणवत असतील तर महिलांनी त्यांच्याशी बोलायला हवं. त्यांच्या भावभावना जाणून घ्यायला हव्यात. त्यांना वाटणारी काळजी आणि वागणुकीत होणाऱ्या बदलांचं नेमकं कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. गरज लागली तर डॉक्टरांची, समुपदेशकांची मदत घ्यावी. हार्मोन्सचं संतुलन साधण्यासाठी जीवनशैलीत, आहारात अगदी साधेसोपे बदल करता येतात. औषधं बदलल्यामुळेही आराम मिळू शकतो. ताणतणावांपासून काही काळ दूर राहिल्यानेही सर्व काही नियंत्रणात येऊ शकतं.



## At a Glance

### राजस्थानात काँग्रेस आमदारांचा गदारोळ

**जयपूर :** राज्य सरकारने नवे जिल्हे बरखास्त केल्याच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष काँग्रेसच्या आमदारांनी बुधवारी विधानसभेत गदारोळ केला. या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष वासुदेव देवनानी यांनी या विषयावर स्थगन प्रस्ताव मांडणाऱ्या दोन आमदारांना गुरुवारी बोलण्याची परवानगी देण्यात येईल.

### पूर्व राजस्थानात हलका पाऊस

**जयपूर :** पश्चिमी विक्षोभामुळे राजस्थानच्या पूर्व भागात बुधवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंतच्या २४ तासांत हलक्या पावसाची नोंद झाली. सपू (धौलपूर) येथे ६ मिमी, सरमथुरा येथे ३ मिमी, निमकठाणा (सीकर) येथे २ मिमी, धौलपूर तालुक्यात २ मिमी, राजाखेडा येथे १ मिमी, बडी (धौलपूर) येथे १ मिमी आणि अजमेर व आसपासच्या भागात रिमझिम पावसाची नोंद झाली आहे.

### कौटुंबिक वादातून दोघांचा मृत्यू

**कोट्टायम (केरळ) :** जिल्ह्यातील पाला जवळील एका गावात कौटुंबिक वादाला भीषण वळण लागल्याने आगीत पती आणि त्याच्या सासूचा मृत्यू झाला. निर्मला (५८) आणि जावई मनोज (४२) अशी मृतांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास मनोज पत्नीच्या घरी गेला होता.

# गाझा पट्टीचे अधिकार अमेरिकेकडे...

## राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा, हमासचे अधिकार संपुष्टात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली आहे की, गाझा पट्टीवर अमेरिका आपली मालकी प्रस्थापित करेल आणि त्याच्या अधिपत्याखाली येईल. गाझा पट्टीत अमेरिका आर्थिक विकास करेल ज्यामुळे मोठ्या संख्येने लोकांना रोजगार आणि घरे उपलब्ध होतील, असेही ट्रम्प यांनी सांगितले आहे. मंगळवारी व्हाईट हाऊसमध्ये इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यासमवेत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ट्रम्प यांनी हे वक्तव्य केले.

मात्र, तेथे असलेले सर्व धोकादायक बॉम्ब आणि इतर शस्त्रे निकामी करणे, त्या जागेचे सपाटीकरण करणे आणि उद्ध्वस्त झालेली इमारत हटविणे ही आपली जबाबदारी असेल, असे ट्रम्प म्हणाले. मात्र, कोणाला राहण्याची परवानगी दिली जाईल, याचा तपशील त्यांनी दिलेला नाही.

दरम्यान, ट्रम्प यांच्या पक्षाच्या सदस्या नॅन्सी मेस यांनी गाझाला मार-ए-लागोमध्ये रूपांतरित करूया, असे आवाहन केले आहे. सोशल मीडियावर ट्रम्प यांच्या वक्तव्यावर जोरदार टीका होत असतानाच रिपब्लिकन पक्षाच्या मेस यांनी हे वक्तव्य केले आहे. मात्र, गाझा अमेरिकेला जोडण्याच्या ट्रम्प यांच्या प्रस्तावाला ही अनेकजण पाठिंबा देत आहेत. ट्रम्प यांच्या प्रचारमोहिमेचे समर्थक बनणारे मेस एकटे नाहीत.

### गाझा पट्टीचा भूगोल कसा आहे?

- एकूण ३६० चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या भूमध्य सागराच्या पूर्व किनाऱ्यावरील ४१ किलोमीटर लांब आणि ६-१२ किलोमीटर रुंद गाझा पट्टीचा विकास आणि पुनर्बांधणी मार-ए-लागोच्या धर्तीवर अमेरिकन सरकारने करावी, अशी मेस्सीप्रमाणेच इतर अनेक रिपब्लिकन सदस्यांची इच्छा आहे. सध्या इस्रायलच्या हल्ल्यात गाझा पट्टी उद्ध्वस्त झाली असून तेथील इमारतींचे भग्नावशेषात रूपांतर झाले आहे. इस्रायल आणि हमास यांच्यात १५ महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षात गाझाचे मोठे नुकसान झाले असून त्यात ४७ हजारांहून अधिक लोक ंचा मृत्यू झाला आहे.
- दुसरीकडे, सौदी अरेबिया, जॉर्डन आणि इजिप्त सारख्या इतर इस्लामी देशांनी गाझा ताब्यात घेण्याचा ट्रम्प यांचा प्रस्ताव यापूर्वीच फेटाळून लावला आहे. ही आमची मातृभूमी असून ती कोणालाही देऊ शकत नाही, असेही संयुक्त राष्ट्रातील पॅलेस्टिनी राजदूतांनी म्हटले आहे. दरम्यान, इस्रायल सरकार आणि हमास यांच्यात शस्त्रसंधी करार होऊनही मध्यपूर्वेतील तणाव कायम आहे.

### मार-ए-लागो म्हणजे काय?

- मार-ए-लागो हे अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यातील पाम बीच या बॅरियर बेटावरील १७ एकरांचे रिसॉर्ट आहे. १२६ खोल्या असलेले हे राष्ट्रीय ऐतिहासिक स्थळ आहे. हे ६२,५०० चौरस फूट क्षेत्रात पसरलेले आहे. १९८५ पासून डोनाल्ड ट्रम्प यांच्या मालकीचे आहे. २०१९ पासून ही मालमत्ता त्यांचे प्राथमिक निवासस्थान आहे. १९२४ ते १९२७ दरम्यान फ्लोरिडा जमिनीच्या तेजीदरम्यान व्यापारी आणि समाजसेवक मार्जोरी मेरिवेदर पोस्टसाठी मार-ए-लागो बांधण्यात आला होता. १९७३ मध्ये मृत्यूपूर्वी पोस्टने हा रिसॉर्ट नॅशनल पार्क सर्व्हिसला दिला. नंतर २३ डिसेंबर १९८० रोजी अमेरिकन संसदेच्या अधिनियम ९६-५८६ द्वारे ते पोस्ट फाऊंडेशनकडे परत करण्यात आले. रिअल इस्टेट टायकून डोनाल्ड ट्रम्प यांनी १९८५ मध्ये हे विकत घेतले होते.
- याला विंटर व्हाईट हाऊस असेही म्हणतात. ट्रम्प यांनी मार-ए-लागो १० दशलक्ष डॉलरमध्ये विकत घेतले आणि आता त्याची किंमत ३४२ दशलक्ष डॉलर म्हणजेच भारतीय चलनात सुमारे ३ हजार कोटी रुपये आहे. यात १२८ खोल्या, ५८ बेडरूम आणि ३३ बाथरूम आहेत. बाथरूमही गोल्ड प्लेटेड आहे. नाट्यगृहे, खाजगी क्लब आणि स्पाही आहेत. याला विश्वाचे केंद्र असेही म्हणतात.

# नेल्लोर गायीला मिळाले ४० कोटी रुपये

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ब्राझीलमधील प्राण्यांच्या जत्रेत भारतीय वंशाची गाय ४० कोटी रुपयांना विकली गेली आहे. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या कोणत्याही गायीसाठी केलेली ही आतापर्यंतची सर्वात महागडी बोली आहे. ब्राझीलमधील मिनास गेराईस येथे एका ग्राहकाने व्हियाटिना-१९ नावाच्या गायीसाठी एवढी मोठी बोली लावली. गायीचे वजन ११०१ किलो आढळले आहे, जे या जातीच्या इतर गायींच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. नेल्लोर जातीची ही गाय चर्चेत आली आहे. ही जात भारतातील आंध्र प्रदेश, तेलंगणा येथे आढळते. व्हियाटिना-१९ नावाच्या गायीला जगभरात मान्यता मिळाली आहे. हे अपवादात्मक जनुक आणि शारीरिक सौंदर्यासाठी ओळखले जाते. तिने मिस साऊथ अमेरिकेचा किताबही जिंकला होता.

तेव्हापासून ते चर्चेत आहे. जगातील अनेक देशांमध्ये चांगल्या जातीच्या गायी तयार करता याव्यात म्हणून लोकांनी या गायीची संतती घेतली आहे. त्यामुळेच जेव्हा या गायीसाठी बोली लावण्यात आली तेव्हा एका ग्राहकाने ४० कोटी रुपयांपर्यंत जास्त किंमत देण्याचा निर्णय घेतला. नेल्लोर जातीच्या गायींना ओंगोल जाती म्हणूनही ओळखले जाते. या गायींचे वैशिष्ट्य म्हणजे त्या अत्यंत कठीण आणि उष्ण परिस्थितीत जगू शकतात. त्यांच्या दूध काढण्याच्या क्षमतेवर परिणाम होत नाही. अत्यंत उष्ण हवामानात गाईचे दूध सहसा कमी होते. याशिवाय नेल्लोर जातीच्या गायींची प्रतिकारशक्तीही उत्तम असून त्या रोगांशी लढण्यास सक्षम आहेत. त्यामुळेच जगभरात त्यांची लोकप्रियता बरीच जास्त आहे.

अतिशय कमी काळजी घेऊनही या गायी कठीण परिस्थितीत जगतात. पांढरी फर आणि खांद्यावर उंच कुबड असलेल्या या गायींचे वैशिष्ट्य असे आहे की त्या उंटांप्रमाणे बराच काळ खाणे-पिणे साठवून ठेवतात. त्यामुळे वाळवंटी, उष्ण प्रदेशात राहणे त्यांना सोपे जाते. त्यामुळेच जगभरात नेल्लोर जातीच्या गायींची मागणी वाढली आहे. अनेकदा चारा वगैरे अभावी जनावरांना जगणे अवघड होऊन बसते. अशावेळी या गायी हा चांगला पर्याय आहे. या गायी चरबी साठवून ठेवतात. कठीण परिस्थितीतही त्यांच्या आरोग्यावर त्याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. ब्राझीलमध्येही नेल्लोर जातीच्या गायीमोठ्या प्रमाणात पाळल्या जातात. ब्राझीलमध्ये १८०० पासून त्यांची प्रथा आहे.



# डीपसीक, चॅटजीपीटी बद्दल इशारा

## अधिकृत कामांसाठी न वापरण्याचा सरकारचा सल्ला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चीनचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल डीपसीक येताच जगभरात झपाट्याने लोकप्रिय होत आहे. गेल्या महिन्यात लाँच झाल्यानंतर लोकप्रियतेच्या बाबतीत चॅटजीपीटीसारख्या कंपन्यांना मागे टाकत हे ॲप्लिकेशनही चर्चेत आले होते. मात्र, भारतासह जगातील अनेक देशांना या चिनी कंपनीबद्दल खात्री वाटत नाही. भारत सरकारने नुकताच डीपसीक आणि चॅटजीपीटी सारख्या ॲप्सच्या वापराबाबत इशारा दिला आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयाने आपल्या




कर्मचाऱ्यांना अधिकृत कामासाठी अशा एआय साधनांचा वापर न करण्याचा सल्ला दिला आहे.

एका वृत्तसंस्थेने ही माहिती दिली आहे. सरकारने या निर्णयामागे अनेक जोखीम असल्याचे म्हटले आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, या ॲप्सच्या वापरामुळे सरकारी कागदपत्रे आणि डेटाच्या प्रायव्हसीला अनेक धोके आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, २९ जानेवारीला दिलेला हा सल्ला मंगळवारी सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर आला आहे. कार्यालयातील संगणक आणि इतर उपकरणांमधील एआय टूल्स आणि एआय ॲप्स (जसे की चॅटजीपीटी, डीपसीक इ.) डेटा आणि कागदपत्रांच्या गोपनीयतेस धोका निर्माण करतात. मात्र, केंद्र सरकारच्या अन्य मंत्रालयांनीही तशा सूचना दिल्या आहेत का, हे स्पष्ट झालेले नाही.

यापूर्वी जगभरातील अनेक देशांनी डेटा सुरक्षेच्या जोखमीचे कारण देत डीपसेकच्या वापरावर असेच निर्बंध लादले आहेत आणि त्याबाबत चेतावणी ही दिली आहे. गेल्या आठवड्यात तैवानने सुरक्षेच्या कारणास्तव चिनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स स्टार्टअप डीपसीकचे तंत्रज्ञान न वापरण्याचे आदेश आपल्या सर्व सरकारी यंत्रणांना दिले होते. त्याचबरोबर चिनी एआय ॲप डीपसीक इन्स्टॉल न करण्याचा इशारा ही अमेरिकन काँग्रेसच्या कार्यालयांना देण्यात आला आहे. ब्रिटननेही आपल्या नागरिकांना असाच इशारा दिला आहे.

### वाल्मिक कराडला न्यायालयाचा दिलासा

**बीड :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात सध्या अटकेत असलेला आरोपी वाल्मिक कराडला हायकोर्टाकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे. वाल्मिक कराडविरोधात ईडी चौकशीची मागणी करणारी याचिका हायकोर्टाने फेटाळली आहे. तसेच याचिकाकर्त्याला कोर्टाकडून २० हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे बीड जिल्हाच नव्हे तर राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांची हत्या वाल्मिक कराडच्या सहकाऱ्यांनी केली असल्याचा आरोप करण्यात आला. यानंतर वाल्मिक कराडची संपत्ती आणि त्याचे अनेक कारनामे समोर आले.

# कॉपीमुक्तीसाठी ड्रोनच्या माध्यमातून नजर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दहावी आणि बारावीच्या परीक्षांबाबत एक महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षा होणार आहेत. या परीक्षा पूर्णपणे कॉपीमुक्त करण्यासाठी राज्य सरकार राज्यभर कॉपीमुक्त अभियान राबवणार आहे, याबाबत राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी हे कॉपीमुक्त अभियान राबवण्याचे आदेश दिलेत. तसेच परीक्षा केंद्रावर गैरप्रकार टाळण्यासाठी ड्रोनचीही परीक्षा केंद्रावर करडी नजर असणार आहे. त्यामुळे दहावी-बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी आता



विद्यार्थ्यांवर ड्रोनच्या माध्यमातून नजर राहणार आहे.

प्रत्येक वर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षा होतात. राज्यात यावर्षी उच्च माध्यमिक बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च यादरम्यान होणार आहे. तर राज्य माध्यमिक इयत्ता दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च यादरम्यान होणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी इयत्ता दहावी आणि बारावीचे परीक्षा भयमुक्त, कॉपीमुक्त आणि चांगल्या वातावरणात परीक्षा पार पाडाव्यात, यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाने प्रयत्न करावेत, असे आदेश दिलेत. याबाबत राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी बैठक घेत आढावा घेतलाय. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार टाळण्यासाठी, कॉपीचे प्रकार रोखण्यासाठी ड्रोनची नजर ठेवण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिलेत.

# कर्जापेक्षा जास्त वसुली केली; मल्ल्याची न्यायालयात धाव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** किंगफिशर एअरलाइन्सविरुद्धच्या कर्जवसुलीप्रक्रियेला विजय मल्ल्याने कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. किंगफिशर एअरलाइन्सवर जवळपास ६२०० कोटी रुपयांचे कर्ज असल्याचा दावा विजय मल्ल्याने केला आहे. बँकेच्या अधिकाऱ्यांनी सुरुवातीच्या कर्जाच्या रकमेपेक्षा कितीतरी जास्त रक्कम वसूल केली आहे. ही याचिका ३ फेब्रुवारी रोजी दाखल करण्यात आली होती. न्यायमूर्ती आर. देवदास यांच्यासमोर बुधवारी या प्रकरणाची थोडक्यात सुनावणी झाली.

विजय मल्ल्याची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील साजन पूवय्या यांनी उच्च न्यायालयात सांगितले की, जोपर्यंत संबंधित पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही तोपर्यंत आपण अंतरिम दिलासा मागत नाही.

न्यायालयाने १० बँका, एक वसुली अधिकारी आणि मालमत्ता पुनर्रचना कंपनीला नोटीस बजावली आहे. त्यांना याचिकेत पक्षकार बनवण्यात आले आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला विजय मल्ल्याने अनेक राष्ट्रीय आणि खाजगी बँकांविरुद्ध (स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक आणि मालमत्ता पुनर्रचना कंपनीसह) वसुली प्रक्रियेला आव्हान दिले होते.

## घुसखोरांविरोधात कारवाई...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**लॉस एंजेलिस** कॅलिफोर्नियातील लॉस एंजेलिस येथे अमेरिकन सुरक्षा यंत्रणांकडून, बेकायदा घुसखोरांविरोधात कठोर कारवाई राबविण्यात येत आहे. अशा कारवाईवेळी सुरक्षा यंत्रणांशी घुसखोर यांच्यात झटापट होताना दिसून येत आहे.

# दमानियांचे आरोप धादांत खोटे; धनंजय मुंडे यांचा खुलासा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आपण कृषिमंत्री असताना कृषी विभागानं एमएआयडीसी विभागामार्फत केलेल्या खरेदीबाबत अंजली दमानिया यांनी जे आरोप केले ते धादांत खोटे आरोप आहेत व हे आरोप त्यांच्या स्वभावाप्रमाणे केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी केलेले आहेत, असा खुलासा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मुंबईत केला. मार्च २०२४ मध्ये राबवण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेवर त्यांनी आक्षेप घेतला. ती प्रक्रिया पूर्णपणे नियमात असून शासनाच्या धोरणांना अनुसरुन करण्यात आली आहे, असं ते म्हणाले.

"गेले ५० दिवस अंजली दमानिया माझ्यावर आरोप करत आहेत. संतोष देशमुख हत्या



प्रकरणातील काही आरोपींची हत्या झाल्याचा आरोप त्यांनी केला होता. केवळ धादांत खोटे आरोप करुन स्वतःची प्रसिद्धी करायची आणि दुसऱ्याला बदनाम करायचं या पलीकडं त्यामध्ये काहीही नाही," असं मुंडे म्हणाले. "गेल्या ५८ दिवसांपासून माझ्यावर मीडिया ट्रायल सुरु आहे. हे का चालू आहे? कशामुळे आहे? कोण चालवतंय? मला माहिती नाही," असंही ते म्हणाले.

# दुकाची चोरांना पालघरमध्ये अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पालघर :** कोकणातील विविध जिल्ह्यांत मोटरसायकल चोरीचे गुन्हे दाखल असलेल्या दोघांना गजाआड करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला यश आलं आहे. या दोघांनी अनेक गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल पोलिसांनी जप्त केली आहे. पालघर जिल्ह्यात केळवा पोलीस ठाण्यात मोटरसायकल चोरीचा गुन्हा २६ जानेवारीला दाखल झाला होता. वैतरणा रेल्वे पुलाच्या जीटीवरून २५ तारखेला सकाळी आठ ते सायंकाळी चार दरम्यान ॲक्टिवा स्कुटी चोरीस गेली होती. या चोरीचा तपास स्थानिक पोलीस तसंच गुन्हे अन्वेषण विभाग करीत होता.

पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, पोलीस उपाधीक्षक, अभिजीत धाराशिवकर यांनी या गुन्ह्याच्या तपासाबाबत मार्गदर्शन केलं. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग या गुन्ह्याचा समांतर तपास करत होता. पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गोपनीय माहितीच्या आधारे तसंच तांत्रिक माहितीचा वापर करून या प्रकरणातील आरोपी विशाल रघुनाथ नाईक (वय ३६, रा. सांची सोसायटी नालासोपारा) तसेच देवा लक्ष्मण थापा (वय ३५, रा. ईशान कॉलनी, नालासोपारा, मूळगाव डोंगलन जिल्हा काठमांडू, नेपाळ) या दोघांना अटक केली.

# तिरुमला देवस्थानची १८ कर्मचाऱ्यांवर कारवाई

**धार्मिक**

**तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) ने आपल्या धार्मिक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १८ कर्मचाऱ्यांवर कारवाई केली आहे. या कर्मचाऱ्यांवर हिंदू परंपरेचे पालन न करणे आणि अहिंदू धार्मिक कृत्ये केल्याचा आरोप आहे. टीटीडी बोर्डाचे अध्यक्ष बी. आर. नायडू यांच्या नेतृत्वाखाली देवस्थानांमध्ये केवळ हिंदू कर्मचारीच काम करू शकतात, असे यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले होते. परंतु चौकशीदरम्यान हे १८ कर्मचारी अहिंदू परंपरेचे पालन करत असल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**तिरुपती :** टीटीडी बोर्डाच्या प्रस्तावानुसार या कर्मचाऱ्यांना तिरुमला आणि त्याच्याशी संबंधित विभागांच्या मंदिरांमधून काढून टाकण्यात येणार आहे. तसेच त्यांना कोणत्याही हिंदू धार्मिक कार्यक्रमात किंवा विधीत सहभागी होता येणार नाही. बोर्डाने या कर्मचाऱ्यांना दोन पर्याय दिले आहेत - एकतर सरकारी विभागात बदलीसाठी अर्ज करा किंवा स्वेच्छानिवृत्ती योजनेअंतर्गत (व्हीआरएस) संस्थेतून निवृत्त व्हा. यापैकी एकही पर्याय त्यांनी स्वीकारला नाही, तर त्यांच्यावर




अधिक कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

टीटीडीचे अध्यक्ष बी. आर. नायडू यांच्या निर्देशानुसार टीटीडीमध्ये कार्यरत असताना अहिंदू धार्मिक कार्यात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. हिंदू परंपरेचे पालन करण्याऐवजी इतर धर्माशी संबंधित कामांमध्ये गुंतलेल्या १८ कर्मचाऱ्यांची ओळख पटली आहे. अशा कर्मचाऱ्यांना मंदिरे आणि धार्मिक कार्यक्रमांमधून काढून टाकण्यात येणार असून त्यांना बदली किंवा व्हीआरएसचा पर्याय देण्यात आला आहे. टीटीडीचे धार्मिक महत्त्व आणि मंदिरांचे आध्यात्मिक पावित्र्य राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

टीटीडी बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, १९८९ च्या एंडोमेंट ॲक्टनुसार टीटीडीच्या सर्व कर्मचाऱ्यांना हिंदू परंपरेचे पालन करणे बंधनकारक आहे. हे प्रकरण मंदिराचे पावित्र्य आणि भाविकांच्या धार्मिक भावनांशी संबंधित असल्याचे बोर्डाने म्हटले आहे. टीटीडीचे अध्यक्ष बी. आर. नायडू यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते की तिरुमला हे हिंदू श्रद्धेचे केंद्र म्हणून ठेवणे आपले प्राधान्य आहे. देवस्थानांच्या परंपरेचा आदर करण्यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे ते म्हणाले.

टीटीडी बोर्डाचे सदस्य आणि भाजप नेते भानू प्रकाश रेड्डी यांनी या निर्णयाचे समर्थन केले आणि म्हटले की हिंदू मंदिरांचे पावित्र्य जपण्यासाठी हे आवश्यक पाऊल आहे. गरज पडल्यास आम्ही सर्व अहिंदू कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यास तयार आहोत. या निर्णयामुळे तिरुपती मंदिर प्रशासनात कडकपणा येण्याची शक्यता आहे. हिंदूंच्या धार्मिक परंपरेचे पालन व्हावे यासाठी आता अधिक पाळत ठेवता येणार आहे.



'एक मालिका संघाच्या फॉर्मबाबत काही निश्चित सांगू शकत नाही. असे अनेक खेळाडू आहे, ज्यांनी पूर्वी अनेक मालिकांमध्ये आणि स्पर्धांमध्ये सातत्याने कामगिरी बजावली आहे. 'नक्कीच आम्ही अपेक्षेनुसार खेळलो नाही. पण तरी आम्ही चांगलं क्रिकेट खेळलो. दुर्दैवाने बुमराह शेवटच्या दिवशी उपलब्ध नव्हता. आम्ही कदाचित सामना जिंकला असता आणि मालिका बरोबरीत सुटली असती. त्यानंतर या चर्चा नसत्या झाल्या.'


'एक सामना आणि एक दिवस आमचं भवितव्य ठरवू शकत नाही. आम्ही तिथे दोनवेळा मालिका जिंकलो होते आणि आम्ही याआधी वर्ल्ड कपही जिंकलो आहोत. आम्ही वनडे वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यातही पोहोचलो होतो, त्यामुळे त्या गोष्टीही लक्षात ठेवा.' 'वनडेमध्ये गेल्या दीड वर्षात रोहित भाईने ज्याप्रकारे फलंदाजी केली आहे, ती आमच्यासाठी गेम-चेंजिंग ठरली आहे.

— शुभमन गिल

# कुस्ती स्पर्धांचा पुण्यात जंगी आखाडा

## दि. ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान हिंदू गर्जना चषक राज्यस्तरीय स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हिंदू गर्जना प्रतिष्ठान व पुनीत बालन ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदू गर्जना चषक महिला व पुरुष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२५ येत्या दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत रंगणार आहे या कुस्ती स्पर्धेसाठी तब्बल ४५ लाखांची बक्षिसे असून खुल्या विजेत्याला महिंद्रा थार गाडी, चांदीची गदा आणि २ लाख ५१ हजारांचे बक्षिस दिले जाणार आहे.

पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन आणि हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे यांनी पत्रकार परिषदेत या स्पर्धे विषयी माहिती दिली. शिक्षण प्रसारक मंडळीच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने ही स्पर्धा होणार आहे.

टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेत खुला गट हा राज्यस्तरीय पुरुष आणि महिला असा असणार असून इतर गट पुणे शहर आणि जिल्हा अशा स्वरूपाचा असणार आहे. खुल्या गटातील पुरुष विजेत्याला महिंद्रा थार, चांदीची गदा आणि २ लाख ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह असे बक्षीस देण्यात येणार आहे. तर दुसऱ्या क्रमांकाला १ लाख ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह आणि तृतीय क्रमांकाला १ लाख ५१ हजार असे बक्षीस देण्यात येणार आहे. तर खुल्यातील गटातील महिला विजेत्याला २ लाख ५१ हजार ई- बाईक आणि चांदीची गदा, द्वितीय क्रमाकांच्या विजेत्याला चषक आणि १ लाख ५१ हजार आणि तृतीय क्रमांक विजेत्याला चषक आणि १ लाख असे बक्षिसाचे स्वरूप आहे. तर कुमार गटातील कुस्ती स्पर्धा पुणे शहर आणि जिल्ह्यातील पैलवानांसाठी असणार आहे. त्यामधील पहिल्या क्रमांकाच्या विजेत्याला चांदीची गदा आणि १ लाख, द्वितीय क्रमांक विजेत्याला ५० हजार आणि चषक आणि तृतीय क्रमांक विजेत्याला २५ हजार आणि चषक अशा स्वरूपाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. याशिवाय कुमार गटातील वय वर्ष १७ आणि वय वर्ष १४ च्या खालील गटातील पहिल्या क्रमांकाच्या विजेत्यांना सायकल आणि रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

इराणचे मल्ल मिर्झा आणि आली यांचा प्रेक्षणीय सामना या स्पर्धे दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. तर अनेक हिंदकेसरी महाराष्ट्र केसरी उपस्थित राहणार असून या निमित्ताने त्यांचाही विशेष गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी स. प. महाविद्यालयात मातीचे दोन स्वतंत्र आखाडे असणार असून जवळपास १० हजार प्रेक्षकांची बसण्याची सोय होईल असे भव्य स्टेडियम उभारण्यात आले आहे. तसेच वाहनांच्या पार्किग साठी मोठी व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी येणाऱ्या पुरुष आणि महिला पैलवानांसाठी राहण्याची आणि भोजनाची सोय आयोजकांच्यावतीने करण्यात येणार आहे. महाराष्ट्र केसरीच्या तोडीस तोड ही स्पर्धा आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या स्पर्धेसाठी नामवंत खेळाडू, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे धीरज घाटे आणि पुनीत बालन यांनी सांगितले. पुणेकरांनी या स्पर्धेसाठी उपस्थित राहून मातीतील कुस्तीचा थरार अनुभवावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## सहारा क्रिकेट अकादमी, सनराईज क्रिकेट स्कूल संघांचे विजय

**पुणे :** थर्ड आय स्पोर्टस अँड इव्हेंटस एलएलपी यांच्या वतीने आयोजित थर्ड आय १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत सहारा क्रिकेट अकादमी,






सनराईज क्रिकेट स्कूल या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली. भुकुम येथील मानसाके जिमखाना क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत आदित्य तुळजापूरकर(५-२४) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर सहारा क्रिकेट अकादमी संघाने स्केल अप क्रिकेट अकादमी ब संघाचा ८३ धावांनी पराभव करून विजयी सुरुवात केली. दुसऱ्या लढतीत आर्यन देवडकर(६१धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर सनराईज क्रिकेट स्कूल संघाने विजय क्रिकेट अकादमी संघाचा ६ गडी राखून पराभव केला.

## २५ टेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेचे ६ फेब्रुवारीपासून आयोजन

**पुणे :** लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डी२ तर्फे पंधराव्या 'लायन्स् प्रीमियर लीग' २०२४-२५ टेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. ६ ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत हिंजवडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदान आणि सहकानगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूलच्या मैदानावर होणार आहे. या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डी२चे क्रीडा प्रमुख भूपेंद्र सिंग धुल्लट आणि लायन्स प्रीमियर लीग चे मार्गदर्शक वसंतभाऊ कोकणे यांनी सांगितले की, व्हाईट बॉलवर साखळी आणि बाद फेरीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत एकूण ६ निमंत्रित संघ सहभागी होणार आहेत. खुल्या गटातील खेळाडू या स्पर्धेत भाग घेणार आहेत. साची सुपरकिंग्ज्, रिस्क्राइब, रूद्र वॉरीयर्स, नायर ईगल्स्, एस.के. वॉरीयर्स आणि योगेश व्हिक्टर्स या संघांमध्ये विजेतपदाची चुरस पहावयास मिळणार आहे. साखळी फेरीनंतर अव्वल चार संघ हे उपांत्य फेरीमध्ये प्रवेश करणार आहेत. विजेत्या संघाला करंडक तर, उपविजेत्या संघाला करंडक मिळणार आहे. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टीरक्षक याबरोबरच मालिकेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर अशी पारितोषिके देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## वरुण चक्रवर्तीची आयसीसी टी-२० क्रमवारीत कमाल


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** वरुण चक्रवर्तीने इंग्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेत अप्रतिम कामगिरी केली होती. ज्यामध्ये त्याला मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरविण्यात आले होते. यानंतर त्याला लॉटरी लागली आणि आता तो इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतही खेळताना दिसणार आहे. त्याला अचानक संघात प्रवेश मिळाला. दरम्यान, वरुण चक्रवर्तीने आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या टी-२० क्रमवारीतही मोठी झेप घेतली आहे. तो टॉप-३ मध्ये पोहोचला आहे. विशेष म्हणजे टॉपवर पोहोचण्या खूप जवळ आहे, हे निश्चित झाले आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या नवीन टी-२० गोलंदाजांच्या क्रमवारीत इंग्लंडच्या आदिल रशीदचे नुकसान झाले आहे. तो पहिल्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. विशेष म्हणजे वेस्ट इंडिजचा अकिल हुसेन न खेळताही पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. सध्या अकील हुसेनचे रेटिंग पॉइंट ७०७ आहेत, तर आदिल रशीद ७०५ रेटिंग पॉइंटसह दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. वरुण चक्रवर्तीचे पण ७०५ रेटिंग रेटिंग पॉइंटसह आहे. त्यामुळे तो संयुक्त दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. वरुण चक्रवर्तीने यावेळच्या क्रमवारीत तीन स्थानांनी झेप घेतली आहे.

## पीसीपीच्या विद्यार्थ्यांची बुद्धिबळ, कॅरम स्पर्धेत हॅट्रिक




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन, डी.१ झोन च्या वतीने विविध वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद मिळवून हॅट्रिक केली. कॅरम स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलीटेक्निक (पीसीपी) मधील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. पीसीपीच्या संघाने या स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद पटकावून हॅट्रिक साध्य केली. मुलींच्या संघाने कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले व बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

वेणुताई पॉलिटेक्निक, पुणे येथे झालेल्या मुलांच्या कॅरम स्पर्धेत विजेत्या संघांना प्राचार्या डॉ. एम. एस. जाधव , समन्वयक डी - १ झोनल हेडकॉटर वाय. एल. निंबाळकर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. द्वितीय क्रमांक मुलांच्या स्पर्धेमध्ये जी. पी. अवसरी संघाने मिळवला.

अजिंक्य डी. वाय. पाटील लोहगाव, पुणे येथे झालेल्या मुलींच्या बुद्धिबळ व कॅरम स्पर्धेत विजेत्या व उपविजेता संघांना प्राचार्या डॉ. एफ. बी. सय्यद, पॉलीटेक्निक कॉर्डिनेटर एन. एल. शेळके व स्पोर्ट्स कॉर्डिनेटर अतुल हिवळे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कॅरम स्पर्धेत द्वितीय क्रमांक मुलींच्या स्पर्धेमध्ये जी. पी. अवसरी संघाने मिळवला. तर चेस स्पर्धेत पहिला क्रमांक वाडिया कॉलेज पुणे यांनी मिळवला.

यशस्वी विद्यार्थी व संघ व्यवस्थापक प्रा. संपत ननवरे, राजू गायकवाड, मारुती गायकवाड, प्रा. कोमल वाणी, प्रा. रेशमी ओव्हाळ, क्रीडा समन्वयक सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे,

प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.

## स्पर्धेपूर्वीच 'कॅप्टन' बदलण्याच्या हालचाली, दोन नावं शर्यतीत




**नवी दिल्ली :** भारतीय संघाने मंगळवारी इंग्लंडविरुद्धच्या वन डे मालिकेसाठीच्या संघात अचानक वरुण चक्रवर्थीच्या नावाचा समावेश केला. त्याचवेळी जसप्रीत बुमराहचं नाव संघातून गायब दिसल्याने, तो चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळण्याची शक्यताही मावळत चालली आहे. पाकिस्तान व दुबई येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी सर्व ८ सहभागी देशांनी त्यांचे संघ जाहीर केले आहेत, परंतु नियमानुसार १३ किंवा १५ फेब्रुवारीपर्यंत त्यांना संघात बदल करता येणार आहे. त्यामुळे जसप्रीतच्या समावेशाबाबतचा निर्णय अद्याप गुलदस्त्यात आहे. त्याचवेळी कर्णधारबदलाच्या हालचाली सुरू झाल्याचे वृत्त समोर आले आहे. पण, हा टीम इंडियाचा कर्णधार बदलला जाणार नाही, तर ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स ( Pat Cummins) बाबतचे हे वृत्त आहे. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार कमिन्स याचे चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळणे जवळपास अशक्य मानले जात आहे. त्याच्या अनुपस्थितीत स्टीव्ह स्मिथ किंवा ट्रॅव्हिस हेड यापैकी एक ऑस्ट्रेलियन संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे.

## १६ वर्षाखालील कसोटी क्रिकेट स्पर्धेत पहिल्या डावात चोंधे पाटील क्रिकेट अकादमीचे वर्चस्व

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणी यांच्या वतीने आयोजित लायन्स क्लब करंडक १६ वर्षाखालील कसोटी क्रिकेट स्पर्धेत अथर्व आर्या(३-१), आर्यन डागा(२-१६), पलाश पाटील(२-१०) यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर चोंधे पाटील क्रिकेट अकादमी संघाने ऑल स्टार क्रिकेट अकादमी संघाविरुद्ध पहिल्या डावात ३८धावांची आघाडी घेत वर्चस्व गाजवले.

फोर स्टार ग्राउंड हिंजवडी येथे आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी प्रथम फलंदाजी करताना चोंधे पाटील क्रिकेट अकादमीच्या अथर्व आर्या(३-१), आर्यन डागा(२-१६), पलाश पाटील(२-१०) यांनी केलेल्या अचूक गोलंदाजी पुढे ऑल स्टार क्रिकेट अकादमी संघाचा डाव ३७.३ षटकात सर्व बाद ८० धावावर संपुष्टात आला. यात अर्णव लांडे २७, संवाद गायकवाड १७, आदिराज १८ यांनी धावा केल्या. याच्या उत्तरात चोंधे पाटील क्रिकेट अकादमी संघाने ४५ षटकात सर्व बाद ११८ धावा केल्या. यात सार्थक देशमुख ३३(६२,३×४), आर्यन डागा २३, अमित यादव २२, आदित बन्सीवाल १६ यांनी धावा काढून संघाला पहिल्या डावात ३८ धावांची आघाडी मिळवून दिली. आज दिवस अखेर दुसऱ्या डावात ऑल स्टार क्रिकेट अकादमीने ०.५षटकात २बाद १धावा केल्या. दोन्ही संघातील अजून एक दिवसाचा खेळ शिल्लक आहे.

दुसऱ्या लढतीत पहिल्यांदा खेळताना शिळीमकर स्पोर्टस अकादमी संघाने ५९.३षटकात सर्व बाद २२४ धावा केल्या. यात भव्य वडोदरिया ५१, अथर्व त्रिपाठी ४३, आर्य भूर्से ३१, कृष्णा गायकवाड २२ यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. सर डॉन ब्रॅडमन क्रिकेट अकादमीकडून हर्ष शिंदे(३-३७), साई गायकवाड(२-२२), अपूर्व बिडकर(२-२६) यांनी सुरेख गोलंदाजी केली. आज दिवस अखेर सर डॉन ब्रॅडमन क्रिकेट अकादमी संघाने २८ षटकात ६ बाद ९५ धावा केल्या. दोन्ही संघातील अजून एक दिवसाचा खेळ बाकी आहे. याआधी स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणीचे सदस्य व डिस्ट्रिक चेअर पर्सन क्रिकेट ला. भूपेंद्र दुल्लत यांच्या हस्ते करण्यात आले.

## चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीसाठी शेवटची संधी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** इंग्लंडचा टी-२० मालिकेत एकतर्फी पराभव केल्यानंतर, टीम इंडिया आता ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीची तयारी करण्यासाठी भारताला ही शेवटची संधी आहे. यामध्ये, भारताला त्यांचे प्लेइंग-११ अंतिम करायचे आहे आणि स्पर्धेसाठी रणनीती देखील बनवायची आहे.

स्पर्धेपूर्वी टीम इंडियाला अनेक प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा फॉर्म परत येईल की नाही? जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शामी यांचा फिटनेसही चिंतेचा विषय आहे. जर दोघेही पूर्ण लयीत गोलंदाजी करू शकत नसतील तर त्यांची उणीव कोण भरून काढेल?

टीम इंडियाचे वरिष्ठ फलंदाज विराट कोहली आणि कर्णधार रोहित शर्मा खराब फॉर्मशी झुंजत आहेत. २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यापासून, कोहलीला फक्त एकच शतक करता आले आहे, तर रोहितला एकही शतक करता आलेले नाही. रोहितने श्रीलंकेविरुद्धच्या ३ एकदिवसीय सामन्यांमध्ये अर्धशतके झळकावली, पण दोन्ही खेळाडू कसोटी स्वरूपात अपयशी ठरले.

## बांगलादेश प्रीमियर लीगच्या चौकशीचे आदेश

**नवी दिल्ली :** खेळाडूंच्या देयकांवरील वादाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेश प्रीमियर लीगवर मॅच फिक्सिंगचे आरोप लावण्यात आले आहेत. यावर, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने सोमवार, ३ फेब्रुवारी रोजी स्वतंत्र चौकशी केली. लीगच्या चालू हंगामातील ८ सामन्यांची चौकशी सुरू आहे. यापैकी ६ आंतरराष्ट्रीय खेळाडूंसह १० खेळाडू आणि ७ पैकी ४ फ्रँचायझींवर फिक्सिंगचा आरोप आहे. बोर्डाचे अध्यक्ष फारुख अहमद म्हणाले, 'जर कोणताही खेळाडू चुकीच्या कृत्यात सहभागी आढळला तर. त्यानंतर त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल. ते कोणत्याही गुन्हेगाराला सोडणार नाहीत. त्यांनी क्रिकबझला सांगितले की, 'तपास पूर्ण होईपर्यंत ते यावर कोणतीही अधिकृत टिप्पणी करू शकत नाहीत.' कारण त्यांना एक प्रोटोकॉल पाळावा लागतो. स्पर्धेदरम्यान घडणाऱ्या सर्व घटनांची नोंद घेतली जाते आणि नंतर त्यांची चौकशी केली जाते. बीपीएल-२०२४-२५ चा क्वालिफायर-२ सामना बुधवारी संध्याकाळी ६ वाजता मीरपूरमध्ये चटगांव किंग्ज आणि खुलना टायगर्स यांच्यात खेळला जाईल. फॉर्च्यून बारिशाल आधीच अंतिम फेरीत पोहोचला आहे. क्वालिफायर-१ मध्ये त्यांनी चटगांव किंग्जचा ९ गडी राखून पराभव केला होता. अंतिम सामना ७ फेब्रुवारी रोजी मीरपूर येथे खेळला जाईल.

## पॅट कमिन्सचे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळणे कठीण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सचे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळणे कठीण वाटत आहे. तो घोट्याच्या दुखापतीने त्रस्त आहे. कमिन्सच्या अनुपस्थितीत, स्टीव्ह स्मिथ किंवा ट्रॅव्हिस हेड कांगारू संघाचे नेतृत्व करू शकतात.

संघाचे प्रशिक्षक अँड्रयू मॅकडोनाल्ड यांनी बुधवारी सांगितले - 'कमिन्स अद्याप गोलंदाजी सुरू करू शकलेला नाही. त्यांना खेळणे जवळजवळ अशक्य आहे. अशा परिस्थितीत आपल्याला एका कर्णधाराची गरज आहे. स्टीव्ह स्मिथ आणि ट्रॅव्हिस हेड हे दोन खेळाडू आहेत ज्यांच्याकडे आपण नेतृत्वासाठी पाहू. जोश हेझलवूडच्या दुखापतीबद्दल प्रशिक्षक म्हणाले, 'तो वेळेवर पुनरागमन करण्यासाठी देखील संघर्ष करत आहे. भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान हेझलवूडला दुखापत झाली होती. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये १९ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे आणि ९ मार्चपर्यंत चालेल. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाने अलीकडेच भारताविरुद्ध बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी (BGT) ३-१ ने जिंकली. कमिन्स हा बीजीटीमध्ये संघाचा सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता. त्याने २०२३ मध्ये त्याच्या संघाला एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिला. दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे पॅट कमिन्स श्रीलंकेविरुद्धचा दुसरा कसोटी सामना खेळू शकला नाही.

## पूना क्लब गोल्फ लीग स्पर्धा : एबी, जीजी अँड मनप्रीत जॅग्वार्स संघाला उपविजेतेपद

# हिलयॉस ईगल्स संघाची विजेतेपदाची हॅटट्रिक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूना क्लब लिमिटेड यांच्या वतीने आयोजित पूना क्लब गोल्फ लीग स्पर्धेत संपूर्ण स्पर्धेत सातत्याने उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या हिलयॉस ईगल्स संघाने सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावताना हॅटट्रिक साधली. एबी, जीजी अँड मनप्रीत जॅग्वार्स संघाने उपविजेतेपद पटकावले.

येरवडा येथील पूना क्लब गोल्फ येथे पार पडलेल्या ड्यूकॅटी लीगसी मोटर्स यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभलेल्या इरिगेशन प्रॉडक्टस प्रायव्हेट लिमिटेड, टोरो, कोलते पाटील डेव्हलपर्स यांचे सह प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत हिलयॉस ईगल्स संघाने २०२०, २०२३, २०२४ अशी गेल्या सहा वर्षात चौथ्यांदा विजेतेपद मिळवण्याची आगळीवेगळी कामगिरी कामगिरी बजावली आहे. अंतिम फेरीत उत्कृष्ट पटींग आणि अचूक चिपिंग अशा कामगिरीच्या जोरावर गतविजेत्या हिलयॉस ईगल्स संघाने १६ गुणांसह अजिंक्यपद राखले. विजेत्या हिलयॉस ईगल्स संघाच्या विजयात सुशांत खोसला, जियाजी भोसले, रुद्रांशवर्धन सिंग, संजीव



हुकमानी, ऋषी भोसले, सलील भार्गव आणि अनिता पूनामिया यांनी मोलाचा वाटा उचलला. गुर्की शेरगील हे हिलयॉस ईगल्स संघाचे प्रशिक्षक आहेत. एबी अँड जीजी जगवर्स आणि मानव पारी पिन सिकर्स यांनी प्रत्येकी १३ गुणांसह संयुक्त दुसरा क्रमांक पटकावला. एकूण ८ संघांचा अंतिम फेरीत सहभाग होता. यामध्ये केके रॉयल्स, जिंगर्स, एबी, जीजी अँड मनप्रीत जॅग्वार्स, हिलयॉस ईगल्स , शुबान सनरायजर्स, मानव पारी पिन सिकर्स आणि व्हॅस्कॉन द होली वन्स आणि एरिस्टा फेअरवे टायटन्स यांचा समावेश होता. अखेरच्या साखळी लढतींमध्ये जॅग्वार्स, टायटन्स, आणि शिर्के बर्डीज बँडिट्स यांची प्रत्येकी ३७ गुणांसह बरोबरी झाल्यानंतर जॅग्वार्स आणि एरिस्टा फेअरवे टायटन्स यांना वाईल्ड कार्ड द्वारे अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला. पूना क्लबचे अध्यक्ष गौरव गढोक म्हणाले की, पूना क्लब गोल्फ लीग हि स्पर्धा दरवर्षी नवनवे मानदंड प्रस्थापित करत आली आहे. यावर्षीच्या स्पर्धेतून गुणवत्ता आणि स्पर्धात्मकतेबरोबरच सर्व खेळाडूंमधील बंधुभाव विशेष करून दिसून आला.